म. ४७/१
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
भू. प्रवास
लेखक
पुस्तकाचें नांव
सन
संग्रहालय क्रमांक
४७/१
६५

४७/१
सं. क्र.

# मोहोरच्या प्रवास.

(भू - प्रवास)

# लाहोरचा प्रवास.

गोविंद बाबाजी जोशी

पब्लीक प्रिचर

गायकवाड स्टेट

यांचा.

प्रवासाची व सामाजिक परिषदेची

हकीकत.

सन १८९९.

स. छा. छा.

# प्रस्तावना.

प्रवासाचें वृत्त लिहिण्यानें लोकांस ठिकठिकाणचें स्थळांचीं माहिती होतें व दुरदुर शहरीं उतरण्यास काय काय सोई आहेत याची माहिती होऊन त्या योगें प्रवासाचें साधनांत मोठी मदत होते. त्याचप्रमाणें सामाजि सुधारणेंसंबंधीं भिन्न भिन्न स्थळीं कोणकोणते फेरबदल होत चालले आहेत. व त्या योगें आपण आपल्यांत बदल करण्यासारख्या कालास अनुसरून कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत याची कल्पना मनांत येते.

या माझे प्रवासाचें वृत्त वांचून जर माझे प्रियदेशबंधूंस थोडीशी मदत झाली तर या माझे मेहनतीचे सार्थक झाले असें समजेन.

बडोदें

तारीख १ दिजंबर १८९९

आपला

गोविंद बाबाजी जोशी.

मराठी ग्रंथ
स. ग्रं. १२६८

# लाहोर कान्ग्रेसला जाणें

# व

# प्रवासाचें वर्णन.

तारीख १७ डिसेंबर सन १८९३.

आजरोजीं बडोदें सोडून लाहोर येथें कॉंग्रेसला जाण्याकरितां निघालों तो रात्रीं बरावर एक वाजतां अजमीर येथें दाखल झालों. बडोद्यांहून अजमीर ३६८ मैल आहे.

तारीख १८ डिसेंबर सन १८९३.

मुक्काम अजमीर.

अजमीर येथें महाराष्ट्र ब्राह्मणांचीं सुमारें २९ कुटुंबें राहतात. हीं बहुतकरून सर्व तेथील "कडका" चौकांत रामधरदास नरशीदास यांचे हवेलींत राहतात व कांहीं थोडे लोक दुसरे एके ठिकाणीं राहतात. हे सर्व लोक रेल्वेचे नोकरीसंबंधानें तेथें राहिलेले आहेत. परंतु पारशी, गुजराथी आणि मराठे यांमध्यें जो तफावत असतो तो असा कीं, पारशी व गुजराथी लोक धंद्याचे संबंधानें जेथें जातात तेथें वसाहत होतात; परंतु महाराष्ट्र लोक तसें करीत नाहींत. साधारण अशी ह्मण आहे कीं, उंटाचें तोंड मरणसमयीं मारवाडाकडे असतें" तशी महाराष्ट्र लोकां-

ची स्थिति आहे. तेलंग लोकांची स्थिति तर यांहीपेक्षां वाईट आहे. ते लोक आज हजारों वर्षांपासून महाराष्ट्र देशांत उपजीविकेकारितां येतात पण एकही तेलंग इकडे घर बांधून राहिलेला आहे असें आढळावयाचें नाहीं. आतां याला एक अपवाद आहे तो हा कीं, महाराष्ट्र लोकांचा पेशा स्थाइकचा नाहीं. अळवाचे पानावरील जलबिंदुप्रमाणें असतो. नोकरी केव्हां जाईल याचा नेम नसतो; परंतु अजमीर येथें जे महाराष्ट्र लोक आहेत त्यांच्यांत वरील अपवादाचे संबंधानें थोडासा फरक आहे. येथें जे रेल्वेकडे मोठमोठे पगाराचे नोकर आहेत त्यांच्या नोकऱ्या पेन्शनेबल् असून त्यांच्या बदल्या होण्याचा फार थोडा संभव आहे, कारण त्या सर्वांच्या नोकऱ्या "रेल्वेच्या लोकोमोटिव्ह डिपार्टमेन्ट" मध्यें असून अजमीर हें राजपुताना रेल्वेचें मुख्य ठिकाण असल्यामुळें त्यांच्या नोकऱ्याही तशाच स्थाईकसारख्या झालेल्या आहेत. तेव्हां त्याजपैकीं कोणी घरदार करण्याचें मनांत आणिल्यास इतर नोकरांपेक्षां त्यांस बरीच स्थाईकता येण्यासारखी आहे. तशांत सांप्रत रेल्वेसारखीं प्रवासाचीं साधनें सुलभ झाल्यामुळें शरीरसंबंधासही फारशी अडचण पडण्याचा संभव नाहीं. भिन्न भिन्न ठिकाणीं वसाहत करण्याचे कामांत देशस्थ व कऱ्हाडे जितके पुढें आहेत तितके कोकणस्थ आढळावयाचे नाहींत. त्यांस शेवटीं ताक आणि अळवाचे भाजीचे प्रदेशांत परत जाण्याची फार उत्कंठा असते. अजमीर येथें जीं कुटुंबें हल्लीं आहेत त्यांत बहुतकरून सर्व या वरील वर्गांतलींच आहेत. आह्मीं हिंदू लोकांनीं यासंबंधानें पारशी लोकांचा कित्ता वळविल्यास त्यापासून देशाचें फार हित होण्याचा संभव आहे.

दयानंद सरस्वती म्हणून थोडे वर्षांपूर्वी जे प्रख्यात धर्म-स्थापक पुरूष होऊन गेले त्यांच्या नांवाचें तेथें विद्यालय आहे. राजाराम मोहनराय यांस ज्याप्रमाणें ब्राह्मधर्माचे स्थापक असें मानतात त्याचप्रमाणें दयानंद सरस्वती हे आर्यधर्मांचे स्थापक होत. या धर्माची इकडे बरीच प्रसिद्धि असून या प्रांतांत चहूंकडे या समाजाची स्थापना झालेली आहे. या स्वामीचे नांवानें अजमीर येथें एक पाठशाळा स्थापन झालेली आहे. या शाळेंत विद्यार्थ्यांस वेदमंत्रासह इंग्रजी शिकवितात. ही शाळा पाहण्यास मी गेलों होतों ते समयीं हाजरी पटावर १५० विद्यार्थी होते. मीं पहिल्या वर्गाची परीक्षा शाळेचे मुख्य अध्यापकाचे इच्छेवरून घेतली, ( हे गृहस्थ ग्रॅज्युएट आहेत ) ते समयीं वर्गांतील बऱ्याच मुलांनीं वेदमंत्र सुरावर म्हणून दाखविले. मुलांचे ते शुद्ध उच्चार व म्हणण्याची सरणी पाहून मनास आनंद वाटतो. माझी समजूत अशी आहे कीं, या पाठशाळेंत अमुकच जातीच्या मुलांनीं वेदाभ्यास करावा असा नियम नसून जसजसे विद्यार्थी पुढें शिकत जातात तसतसा त्यांचा वेदाभ्यासही जाती धर्माचा प्रतिबंध आड न येतां वृद्धिंगत होतो. या पाठ शाळेंत उर्दूही शिकवीत असतात. या शाळेकरितां स्वतंत्र इमारत बांधली असून दर आठ दिवसांनीं आर्यसमाजाची सभासद मंडळी प्रार्थनेकरितां एकत्र होत असते. याशिवाय स्वामीचे नांवाचा छापखानाही आहे, त्यास "यंत्रालय" असें म्हणतात. आर्यसमाजाचे सेक्रेटरी यांचे इच्छेवरून तें यंत्रालय पाहण्यास मी गेलों होतों. माझी प्रथम अशी समजूत झाली होती कीं, यंत्रालय म्हणजे कदाचित वर्कशॉपसारखा कांहीं कारखाना असेल; परंतु मीं जेव्हां प्रत्यक्ष पाहिलें तेव्हां खात्री झाली

कीं, इकडे छापखान्यास यंत्रालय असें म्हणतात. छापखान्याची इमारतही स्वतंत्र बांधलेली आहे. या मुद्रालयाचा दरमहाचा खर्च रुपये ३०० आहे. या कारखान्यांत एकंदर ३० मनुष्यें काम करीत असतात. येथें आजपर्यंत एकंदर ग्रंथ छापून प्रसिद्ध झाले त्यांचीं नांवें.

अजमीर येथील वैदिक यंत्रालयांत आजपर्यंत छापलेल्या पुस्तकांची यादी—

१ ऋग्वेदादिभाष्यभूमिका.
२ वर्णोच्चारणशिक्षा.
३ संधीविषय.
४ नामिक.
५ कारकीय.
६ सामासिक.
७ स्त्रैणताद्धित.
८ अव्ययार्थ.
९ सौवर.
१० आख्यातिक.
११ पारिभाषिक.
१२ धातुपाठ.
१३ निघण्टु.
१४ निरुक्त.
१५ अष्टाध्यायी मूल.
१६ संस्कृत वाक्यप्रबोध.
१७ हवनमंत्र.
१८ व्यवहारभानु.
१९ भ्रमोच्छेदन.
२० अनुभ्रमोच्छेदन.
२१ मेळाचांदापूर.
२२ आर्योद्देशरत्नमाला.
२३ गोकरुणानिधि.
२४ स्वामी नारायणमतखंडन ( गुजराथी ).
२५ वेदविरुद्धमतखंडन.
२६ स्वमंतव्याऽमन्तव्यप्रकाश.
२७ शास्त्रार्थ फिरोजाबाद.

भू.प्र. ४० / २

२८ शास्त्रार्थ काशी. २९ आर्याभिविनय.
३० वेदांतितनिवारण. ३१ भ्रांतिनिवारण.
३२ पञ्चमहायज्ञविधि. ३३ आर्यसमाजाचे नियम.
३४ उपनियम. ३५ सत्यार्थप्रकाश.
३६ संस्कारविधि. ३७ स्वीकारपत्र.

या यादींतील सत्यार्थप्रकाश या ग्रंथाच्या चारवेळ आवृत्ति निघाल्या, इतका तो ग्रंथ तिकडे लोकमान्य झाला आहे. यांत धर्मसंबंधी चांगले सिद्धांत प्रतिपादन केले आहेत, असें मुद्रालयाचे शास्त्री सांगत होते.

अजमीर शहर साधारणपणें डोंगराच्या पायथ्याशीं वसलेलें आहे, असें दिसतें; परंतु खरोखर पाहिलें तर तें डोंगराचे दरींत आहे. ज्या डोंगराचे पायथ्याशीं हें शहर वसलेलें आहे, त्याचे पूर्वबाजूकडे थोडीशी सपाटी आहे. तिकडून शत्रूनें येऊं नये ह्मणून मोठा कोठ बांधलेला असून, त्यास तीन चार दरवाजे आहेत. अजमीर हें राजपुताना माळवा रेल्वेचें सदर स्टेशन असल्यामुळें रेल्वेकडील अनेक इमारतींनीं या शहरास बरीच शोभा आणिली आहे. मोठमोठ्या शहरांचे विशेष सोईप्रमाणें येथेंही एक तलाव वांधून नळाचें पाणी शहरांत आणिलेलें आहे. इकडील सर्व इमारती दगडीच आहेत. लांकूड कोठें दारांच्या फळ्यांस मात्र असावयाचें. अहमदाबाद सोडली कीं, लांकूड व कौलें सुटलींच ह्मणावयाचीं. सर्व इमारती दगडी व वरगच्च्या अथवा देऊळासारखीं घुमटें असावयाचीं. अजमीर येथें पाहण्यासारखीं अनेक स्थळें आहेत. अजमीर येथील सरकारी बाग

मोठा प्रसिद्ध आहे. 'मेओ कॉलेज' यांत राजपुतान्यांतील राजांचीं मुलें अभ्यास करितात. अजमीरचे दक्षिणेस पुष्करतीर्थ ह्मणून एक प्रसिद्ध स्थान आहे. महायात्रेस जातात त्यांस या तीर्थी स्नान करावें लागतें. या ठिकाणीं दरसाल एक मोठा मेळा भरतो. त्यांत उत्तम जातवान घोडे व बिकानेरचे जंगलांत तयार झालेले तेजदार तट्टू पुष्कळ विकण्यास येतात. यासंबंधानें हिंदुस्थानांतील पुष्कळ घोड्यांचे व्यापारी येथें येतात. अजमीर पासून १८ मैलांवर " सांबरतलाव " खाऱ्या पाण्याचा समुद्र आहे, ज्यास आपण " सांभरी मीठ " असें ह्मणतों तें तेथें पिकतें. सर्व हिंदुस्थानांत याच्या इतका मोठा मिठाचा कारखाना दुसरा नाहीं. इंग्रज सरकारास याचें मोठें उत्पन्न आहे. पर्जन्यकाळीं या तलावाची लांबी वीस मैलपावेतों आणि रुंदी तीन मलांपासून सात मैलांपर्यंत असते. हा तलावही पाहण्यासारखा आहे. अजमीर शहरांत मूळचंद सोनी यानें एक मोठें जैन मंदीर बांधलेलें आहे, तें पाहण्यासारखें असल्यामुळें, मी पाहण्यास गेलों होतों. देऊळाचे आंतील सर्व भिंतींवर सोनेरी मुलाम्याची वेलबुट्टी काढिलेली आहे. त्यायोगें जिकडे पाहवें तिकडे सोनेरी चकचकाट दिसतो. हें देऊळ पाहण्यास गेलें कीं, देऊळांत शिरण्यापूर्वीं आधीं पहाऱ्यांत हातांतील छत्री, काठी, जोडा व ऊर्णवस्त्र ( लोकरीकपडा ) असल्यास काढून ठेवावा लागतो. जोडा, छत्री बाहेर ठेवावी हें ठीकच आहे, पण गळ्याचा गळपट्टा देखील काढून ठेवण्यास जेव्हां शिपायानें सांगितलें तेव्हां मोठें आश्चर्य वाटून मीं विचारलें, " गळपट्टा काढून ठेवण्याचा उद्देश कोणता. " तेव्हां त्यानें उत्तर केलें कीं, हा कपडा पराक्ष पिडा देऊन तयार केलेला आहे, सबब आमच्या

धर्मप्रमाणें तो अपवित्र मानला जातो, ह्मणून आपण येथें काढून ठेवावा. आह्मीं निमूटपणें तसें केलें आणि देऊळाच्या जिन्याच्या पायऱ्या चढण्यास लागलों. देऊळाचे भिंतींवर ठिकठिकाणीं पौराणिक चित्रें काढलेलीं आहेत. त्यांत कैलासपर्वताचा देखावा पाहण्यासारखा आहे. गंगानदीचा उगम व त्यांत जलविहार करणारे मच्छादि चलचर प्राणी यांचीं चित्रें प्रेक्षणीय आहेत. शिवाय चोवीस गणांचें गणितयंत्र आंकड्यांनीं दाखविलें आहे. त्या गणिताबाबद माझी समजूत पडली नाहीं या देऊळाचे मध्यभागीं मुख्य देवाचा रथासारखा लहानसा देव्हारा आहे. ( जैन लोकांस देव नाहींत, परंतु साधूंस ते देवाचे जागीं बसवितात ) त्यांत मूर्ती आणि सभोंवार जैन पुराणांत वर्णन केलेलीं निरनिराळ्या आकृतींचीं लहान लहान मंदिरें इतकीं मांडलेलीं आहेत कीं, ती बारा चवदा हात लांबी रुंदीची जागा अगदीं भरून गेलेली आहे. भिंतीवर ठिकठिकाणीं बोधपर संस्कृत वाक्यें चांगल्या भव्य अक्षरांनीं लिहिलेलीं आहेत. देऊळांत पश्चिम बाजूस पुराण श्रवणास बसण्याची जागा आहे, तेथें स्त्री पुरूष निरनिराळे बसण्याची फार चांगली सोय केलेली आहे. तेथें पुराण श्रवणास बसणारे समुदायाचे दृष्टीसमोरीस भिंतीवर, जसें तिकडे पूर्वेकडे भिंतीवर कैलासाचा देखावा दाखविला आहे, तशी इकडे 'यमपुरी' दाखविली आहे. ह्मणजे मरणानंतर मनुष्यास त्याच्या बऱ्या वाईट आचरणाबदल जीं फळें तेथें भोगावीं लागतात, त्याचीं अनेक प्रकारचीं चित्रें अगदीं हुबेहूब काढून दाखविलीं आहेत. या चित्रांत अनृत भाषण करणारा, परस्त्री रत होणारा, खोटीं वजनें बाळगणारा, धान्यांत, रसांत भेळसेळ करून विकणारा इत्यादि अनेक प्रकारचीं दुष्कृत्यें करणारांची यमराजाचे दरबारीं कशी दु-

दशा होते, हें दाखविलें आहे. ही सर्व यमपुरींतील दुनिया पाहिली ह्मणजे पाहणाराचें मन थोडावेळपावेतों स्तब्ध होऊन जातें. आणि त्यास आपल्या आयुष्यांतील मागील कित्येक वर्तनांचें स्मरण होऊन थोडीशी तरी उपरती होते. थोडक्यांत सांगितलें तर प्रार्थनासमाज, ब्राह्मसमाज किंवा आर्यसमाज, यांतील उत्तम वक्त्यांचे नीतिबोधाचें भाषण ऐकल्यानंतर जो तेथें थोडा वेळपर्यंत श्रोत्यांचे मनावर परिणाम होतो, तसा प्रकार माझे मनावर येथें झाला. अजमिरास जाणारांनीं इतर स्थलांबरोबर हें मंदीरही एकवार पाहवें, अशी मी शिफारस करितों.

अजमीर येथें उतरण्यास स्टेशनाजवळ एक दोन सराया ( धर्मशाळा ) आहेत. अजमीर स्टेशनावर उचले व हलक्या चोऱ्या करणारे लोक फार आहेत, याविषयीं हुशारी ठेवावी. अजमीर हें एवढें मोठें शहर असतां येथें एकही वर्तमानपत्र अथवा मासिक पुस्तक निघत नाहीं, गांवांत लायब्ररी नाहीं, इतकेंच नाहीं तर येथें आर्यसमाजाच्या छापन्याखेरीज दुसरा छापखानासुद्धां नाहीं. मीं दोन प्रहरीं बारा वाजतां अजमीर सोडलें आणि सायंकाळीं वस्तीस जयपुरास आलों. अजमीर पासून जयपूर ८४ मैल आहे.

तारीख २१ डिसेंबर १८९४.

मुक्काम जयपूर.

स्टेशनापासून जयपूर राजधानी सुमारें दोन अडीच मैल दूर आहे. मी रात्रीं जयपुरास दाखल झाल्यामुळें मुक्कामाची बरीच हेबेलंडी उडाली. शहरांत आर्यसमाजाचा शोध करितां मुळींच

[library stamp]

पत्ता लागला नाहीं, सबब परत शहराबाहेर येऊन सांगानेर दरवाजाबाहेर जेठमल नथूमल्लाची सराई ( धर्मशाळा ) आहे, तेथें त्या रात्रीं मुक्काम केला. जयपूर शहराभोंवतालीं कोट असून, जसें एखाद्या किल्यांत शिरावें, त्याप्रमाणें बाहेरील कोटाचे भव्य दरवाजाचे आंतही मोठमोठे विस्तीर्ण दरवाजे लागतात. प्रत्येक दरवाजास निरनिराळीं नांवें आहेत. मी दुसरे दिवशीं प्रात:काळीं अजमेर दरवाजानें शहरांत शिरलों. मीं आपलें सामान बरोबरच गाडींत घालून घेतलें होतें कारण एकट्याची एक वाट आणि महाराष्ट्र मंडळीचा शोध करूं लागलों तों ती मंडळी जेथें राहते, त्यास ब्रम्हपुरी म्हणतात, असें समजलें व तो भाग बराच दूर आहे असेंही समजलें. अजमीर सोडतेसमयीं जयपूर येथें आर्यसमाजांत उतरण्याची सोय केली होती, पण आर्यसमाजाचाही पत्ता बरोबर लागेना. गाडीवालाही तक्रार करूं लागला, सबब मग जवळच श्रीरामचंद्राचें मंदिर आहे असें समजलें, तेथें सामान उतरावें, मग " पुढची बात पुढें " असा विचार करीत आहे, तों रामचंद्र मंदिरांत संस्कृत शाळा आहे, असा शोध लागला तेव्हां तेथें कोणी कदाचित सोईचा गृहस्थ आपल्या मुक्कामास मदत करील असा भेटेल, असें अनुमान करून पहाऱ्यावर सामान ठेवून मंदिराचे माडीवर संस्कृत कॉलेजांत गेलों असतां, तेथील शिपायानें येथें महाराष्ट्र ब्राम्हण गुरू आहेत असें सांगितलें, तेव्हां थोडीशी आशा उत्पन्न झाली पण देवडीवरील पहारेकरी सामान ठेवूं देईना सबब ते पुन्हां गाडींतच ठेवावें लागलें. गाडीवाला गाडीतर घेऊन जाणार नाहींना ? ही आणखी मनांत भीती होतीच. अशा संकटांत शिपायानें मला ज्याचे पाशीं नेलें, ते गृहस्थ अगदीं तद्देशीय

असावे, असें त्यांच्या पोशाखावरून दिसत होतें. या रांगड्या गृहस्थापाशीं शिपायानें मला कोठून आणिलें असें मनांत येऊन खिन्न झालो परंतु त्यांच्याशीं बोलणें सुरू झालें तेव्हां ते महाराष्ट्र ब्राम्हण अशी खातरी झाली. या गृहस्थाचें नांव कृष्णशास्त्री तेलंग यांनीं काशीस अभ्यास केला आहे. येथें दोन रुपये रोज प्रमाणें यांस तनखा ( पगार ) आहे. यांनीं नंतर आपल्या बिऱ्हाडीं माझी सर्व व्यवस्था लाविली. हे गृहस्थ फारच सुस्वभावाचे आहेत. याप्रमाणें माध्यान्हकाळ पार पडल्यावर बाहेर पडलों आणि प्रथम जनरल लायब्ररींत गेलों. माझे हातांत माझी रोजनिशीं होती. लायब्ररीचे दरवाजावरील पहारेकऱ्यानें आधीं मला हातांतील बुक पहाऱ्यांत ठेविण्यास सांगितलें. रोजनिसी तेथें ठेवून जिना चढून गेल्यावर लायब्ररीचे दरवाजापाशीं बसलेल्या शिपायानें हातांतील छत्री तेथें ठेविण्यास सांगितली. याप्रमाणें मी आंत जाऊन वर्तमानपत्राचे टेबलाजवळ खुर्चीवर बसलों तों प्रथम दृष्टीस विझिट बुक पडतें. जर तें बुक प्रवाशाचें नजरेस पडलें नाहीं, तर उठते समयीं लायब्ररीचा शिपाई आपल्या हातांत तें देतो किंवा आपण पहावें अशा प्रकारें आपल्यापुढें ठेवितो ( या बुकांत आपण कोठून आलांत ? आपलें नांव व हुद्दा काय ? जात कोणती ? तें कृपा करून लिहावें, असें लिहिलें असतें. ) अथवा इतकें लिहिण्याविषयीं शिपाई विनंती करितो. येवलें (जिल्हा नाशीक) येथून काँग्रेसला जाणारे डेलिगेट मजला अजमीर येथें प्रथम भेटले होते, परंतु ते जयपुरास मागाहून येणार होते, म्हणून त्यांचा आमचा प्रवास बरोबर झाला नव्हता. ते गृहस्थ जयपुरास आलेले आहेत हें मजला या विझिट बुकावरून समजलें व ते आर्यसमाजांत

सं. १९५८

उतरणार हें मला माहित होतें, सबब लायब्ररीयनकडे आर्यसमाजाचा शोध करितां समजलें कीं, आर्यसमाजास इकडे "वैदिक धर्मसमाज" असें म्हणतात. त्याचा बरोबर पत्ता टिपून घेतला आणि लायब्ररींत कांहीं वेळ बसल्यानंतर आम्हीं आपला मुक्काम वैदिक धर्मसमाजांत कृष्णशास्त्री बोवांकडून सायंकाळीं नेला. या पुस्तकालयांत ग्रंथभरणा फार मोठा आहे. हें पुस्तकालय सन १८६६ सालीं म्हणजे सुमारें २९ वर्षांपूर्वी स्थापन झालेलें आहे. या पुस्तकालयाचा कॅटलॉग आपल्या बडोद्यांचे लायब्ररीचे उपयोगाकरितां म्हणून मी विकत आणिला आहे. ज्या ज्या वेळीं नूतन स्थापन झालेल्या लायब्रेऱ्यांत पुस्तकें खरेदी करण्याचा प्रसंग येतो, ते ते समयीं कोणतीं पुस्तकें खरेदी करावीं, याचा विचार करण्यास मोठी हरकत पडते, याकरितां जुन्या जुन्या लायब्रेऱ्यांचे पुस्तकसंग्रहाच्या यादींच्या प्रती खरेदी करून त्यांचा संग्रह करणें मोठें हितावह आहे, सबब मी सदर कॅटलॉग जयपूर लायब्ररींतून खरेदी करून खालीं आलों तों शिपाईबोवांनीं पुनः अटकाविलें आणि आणिलेल्या पुस्तकाबद्दल पास मागितला, तो दिल्यावर आमची सुटका झाली. असा बंदोबस्त आहे. या लायब्ररींत इकडील मराठी वर्तमानपत्र एकही नाहीं, इतकेंच नाहीं तर मुंबईंतील दररोज निघणाऱ्या इंग्रजी वर्तमानपत्रांपैकीं "टाईम्स" शिवाय माझे दृष्टीस एकही पडलें नाहीं. कलकत्ता नॉर्थवेस्ट प्रॉव्हिन्स्, अलाहाबाद इकडील प्रदेशांतील इंग्रजी, हिंदी वर्तमानपत्रें मात्र टेबलावर विपुल होतीं. हें पुस्तकालयही प्रवाशांनीं पहाण्यासारखें आहे.

पश्चिमेकडील ज्ञानाबरोबर आमच्या देशांत ज्या मादक पदार्थांचा लोट गंगानदीसारखे वेगानें वाहत येत आहे, त्या

मादक पदार्थांचा अंमल जयपूर शहरांत इतर सुधारलेल्या शहरांप्रमाणें बिलकुल माझे दृष्टीस पडला नाहीं, ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. आपल्या बडोदें शहरांत ज्याप्रमाणें कांहीं काळापूर्वी निरुद्योगीपणानें उपजीविका करण्याचा एक धंदा सुरू झाला होता, व त्यांस अलीकडे बराच प्रतिबंध खिचडीच्या नवीन व्यवस्थेनें झाला आहे, त्याप्रमाणें पूर्वींचे कारकीर्दींत जयपूर येथें शिवालयें बांधण्याचीं व त्यासंबंधानें वर्षासनें मिळविण्याचा धंदा सुरू होऊन जयपूर शहरांत १४०० शिवालयें स्थापन झालीं होतीं. माजी राजे रामसिंग महाराज हे वैष्णवपंथी होते. पुढें स्मार्त आणि वैष्णव मताचा बराच वाद पडून त्यानें बऱ्याच स्मार्त मंदिरांची संख्या कमी करून टाकिली व कांहीं राहिलेलीं मंदिरें सरकारी मालकीचीं करून त्यांत कचेऱ्यावगैरे नेल्या, असे प्रकारें देवळाची संख्या आटोक्यांत आणली.

सांप्रत गादिवर बसलेले महाराज हे औरस नसून दत्तक आहेत. त्यांचें वय ३९ पासून ४० चे सुमारास आहे व त्यांसही अजूनपर्यंत संतती नाहीं. राजवाड्यांत जुन्या नृत्य गायन कलेस बरेंच उत्तेजन सुरूं असून त्या नादांत महाराज निमग्न असतात. काम कारभार पूर्वीपार चालत आलेल्या धोरणानें अगदीं नियमानें चालत आहे. सांप्रतचे दिवाण हे बंगाली बाबू असून हे प्रथम येथें शाळामास्तर होऊन आले आणि आपल्या चातुर्यानें मिनिस्टर झाले आहेत. यांच्या भेटीस फारसा प्रतिबंध नसतो. राजाचा विद्याभ्यास छापील हिंदी पुस्तकें वाचणें व थोडेंसें इंग्रेजी या पलिकडे नाहीं. राजाच्या लग्नाच्या चार राण्या आहेत. प्रत्येक राणीस चालत आलेल्या जुन्या नियमांप्रमाणें दरसाल २९

हजार रुपये मिळावयाचे व या २९ हजार रुपयांतूनही त्यांनीं खर्च कसा करावयाचा याचे नियम पूर्वींपासून ठरलेले आहेत, ते असेः–५००० पोशाख ५००० भोजनखर्च ५००० दागिने ५००० धर्मादाय ९००० शिलकेंत. याप्रमाणें खर्च व्हावयाचा. यांत फेरफार करणें तर राजाची विशेष परवानगी घ्यावी लागते व राजाही ती नियम मोडून देण्यास तयार नसतो. लग्नाच्या राण्याशिवाय ठेविलेल्या राखाही बऱ्याच आहेत. या प्रत्येकीस दरसाल पांच हजार रुपये मिळतात. राण्यांचे दिवाण, कारभारी, जमाखर्च लिहिणारे, शिपाई, भालदार, चोबदार, खिसमतगार हे सर्व नोकर स्त्रियाच असतात. मुख्य दिवाण स्त्रीस (वढारण) असें ह्मणतात. स्त्री नोकरांस देखील प्रत्यक्ष राणीसाहेबांबरोबर बोलण्याची परवानगी नाहीं. त्यांस बोलणें असेल तर तें त्यांनीं (वढारण साहेबांपाशीं) बोलावें आणि त्यांनीं मग तें राणीसाहेबांपाशीं बोलावें असा नियम आहे. राण्यांचे महालांत पहारे फार सक्त नियमाचे आहेत. राण्याचे महालाचे दरवाज्यापाशीं पुरुषाची सांवलीसुद्धां पडावयाची नाहीं; मग आंत प्रवेश कोठून होणार! इतकें जनाना आणि मर्दाना यांचे हाडवैर जयपुरांतील राजवाड्यांत आहे. कोणताही पदार्थ राण्यांचे महालांत जाणें तर त्याचा पुरा तपास झाल्याखेरीज तो जाऊं शकत नाहीं. आंत स्त्रियांचे एकंदर आठ पहारे आहेत.

हिंदुस्थानांतील कोणा रजपुताचे मुलास जर राजगादीचा मालक बनण्याचा प्रसंग आला तर तो मोठें भाग्य मानतो; परंतु एखादे अविवाहित रजपूत कन्येस मोठा राजा वरणार असें समजलें कीं, ती बापडी रडत असते. याचें कारण पडद्याची चाल हें होय. ही चाल आपल्यांत मोंगलाईबरोबर आलेली आहे.

मोंगल लोकांचें शूरत्व आमच्यांत पूर्णपणें येण्याचे ऐवजीं रजपूत लोकांत पडद्याची चाल मात्र पूर्णपणें अमलांत आली आहे आणि जसजसा पडदा सक्त तसतसे रजपूत लोक आपणास कुलवानपणाचें मोठें भूषण मानितात. मराठ्यांतही ही चाल तशीच जारी सुरू आहे. श्री रामचंद्राची सीता, शिवाची पार्वती, हे जरी मोठे कीर्तिमान राजे होते तरी त्यांजबरोबर त्यांच्या पत्न्या आपण देऊळांत पाहतो; परंतु ही पद्धत सांप्रत जर कोणी मराठा अमलांत आणील तर त्यास हलकट, सुधारलेला, छचोर असें लोक ह्मणतील. नेपोलियन बोनापार्ट यानें एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, जर देशास आबादान करणें असेल तर स्त्रियांस ज्ञानसंपन्न करा. त्यांस कैदेंत टाकल्या तर त्या कधींही ज्ञानसंपन्न होणार नाहींत. सदरहु बाबत एके गुजराथी पत्राचे दर अंकांत खालीं लिहिलेलें वाक्य छापलेलें असतें.

॥ કહે નેપોલિયન દેશને, કરવા આબાદાન ॥
॥ સાચ રીત એ છે કે, દો માતાને જ્ઞાન ॥ ૧ ॥

हें अगदीं खरें आहे.

जयपुरांत पाहण्यासारखीं पुष्कळ स्थळें आहेत; पैकीं मीं तेथील म्युझियम पाहिलें, त्याचें वर्णन थोडक्यांत देतों. म्युझियम हा इंग्रजी शब्द आहे यास फारशींत अजबखाना असें ह्मणतात. मराठी भाषेंत पदार्थसंग्रहालय ह्मणतात. हिंदीभाषेंत जयपुरकडे " कौतुकालय " ह्मणतात. हें कौतुकालय विस्तीर्ण चार मजली इमारतींत व भोंवतालीं भव्य बाग युरोपियन माळ्याचे देखरेखीखालीं तयार झालेला अशा ठिकाणीं आहे. इमारत बागाचे मध्यभागीं असून भोंवतालीं पशुपक्षी यांचीं निरनिराळीं संग्रह स्थानें

आहेत. या भव्य इमारतींत शिरतांच प्रथमचे कमानीवर " यतः धर्म ततः जयः" असें लालशाईनें मोठे अक्षरांनीं लिहिलेलें वाक्य दृष्टीस पडते या कमानींतून आंत गेलें कीं, पहिला जिना लागतो, तेथील पहारेकरी आपल्यास छत्री, जोडा, काठी ठेविण्याकरितां खण केलेली कपाटासारखी जागा आहे ती दाखवितो. त्या प्रत्येक खणावर जो नंबर असतो त्या नंबराचा पितळी डबल पैशाएवढा पास आपणांस मिळतो. तो घेऊन वर जावें. प्रथमचे दालनांत अनेक पौराणिक चित्रें द्रौपदीचिरहरण, हरिश्चंद्रतारामती कथा, कचदेवयानी, शर्मिष्ठा इत्यादि भिंतीवर चित्रें फारच उत्तम कारागिराचे हस्तें काढविलेलीं आहेत. पुढील दालनांत जयपुरचे गादिवर आजपर्यंत जे, जे राजे येऊन गेले त्यांचीं चित्रें त्या त्या काळच्या पोशाखासह काढलेलीं आहेत आणि त्या प्रत्येक चित्राचेंखालीं गादीवर बसल्याचे व उतरल्याचे सन व संवत दिले आहेत. आणखी पुढील भागांत गेलें कीं, अनेक परदेशांतील लोकांचे देखावे, पोशाख, शिकारींची पद्धत यांचीं चित्रें भिंतीवर काढलेलीं आहेत. पृथ्वीवरील निरनिराळे पुष्कळ देशांतील चित्रें काढलेलीं मीं येथें पाहिलीं. त्यांचें वर्णन करणें फार कठीण. तथापि थोडीशी माहिती येथें देतों चिनी सेनापती आपल्या लष्करासह एका अरुंद पुलावरून उतरत आहे; बौध्यधर्मी लोकांचा धर्मसंबंधानें एकत्र झालेला समाज; सिंहलद्विपांतील राजास राज्याभिषेक; जपान देशांतील राजा शिकारीस जात आहे, इत्यादि इत्यादि अनेक देशांचीं चित्रें येथें दाखविलेलीं आहेत. तें दालन सोडून पुढें गेलें कीं, दुसऱ्या दालनांत अनेक प्रकारचे मनुष्यांचे पुतळे तेथें ठेविलेले आहेत, त्यांपैकीं अंदमान देशांतील जंगली स्त्री पुरुषांचा एक जोडा (अंदमान बेटांतील मूळचे जंगली लोक घर

बांधून मुळींच राहत नसत. उन्हाळ्यांत, पावसाळ्यांत देखील झाडांच्याच आसऱ्यानें राहतअसत तो ठेविला आहे तो पाहण्यासारखा आहे. त्यांचे ते शुद्ध हवेचे योगानें बनलेले प्रफुलीत चेहरे व स्त्रियांची नग्नावस्था व स्तन वगैरे अगदीं जंगली मनुष्यांचे खरे आकृतीप्रमाणें आहेत. त्याचप्रमाणें लुसाई देशांतील मनुष्यें इजिप्त देशांतील ममी (ममी ह्मणजे प्रेत. हें प्रेत चार हजार रुपये खर्च करून येथें आणिलें आहे) वगैरे फारच पाहण्यासारखीं आहेत, याप्रमाणें एक का दोन वस्तूंचें वर्णन करावें. निरनिराळे कपडे, लुगडीं, तऱ्हेतऱ्हेचीं वस्त्रें किती होतीं व तीं टापटिपीनें ठेविण्यास किती श्रम पडत असतील, याची नुस्ती कल्पना सुद्धां होणें अशक्य आहे. खनीज पदार्थ सरपटणारे प्राणी, मोठमोठाले विषारी नाग विस्तीर्ण बाटल्यांत बंद करून तेथें ठेविलेले आहेत. याप्रमाणें आह्मीं वरील संग्रह पाहून खालीं आलों आणि भोंवतालचीं जिवंत जनावेरें पाहिलीं. त्यांत जलचर प्राण्यांत असे चमत्कारिक प्राणी पाहिले कीं, त्यांचे अंगावर मांजराप्रमाणें अगर कोल्ह्याप्रमाणें केंस असून तें जलचर प्राणी आहेत व त्यांस चार पायही आहेत. माझे गांवीं वसईस मी असतांना जलमार्गानें वारंवार ठाण, कल्याण, भिवंडी येथें गेललों आहें. तेसमयीं गलबत चालू असतां किनाऱ्यापासून दोन तीन हातांचे अंतरावर एखादेवेळेस चुटपुटते असे प्रकारचे प्राणी मी पाहिले होते व त्यावेळेस त्यासंबंधानें तपास करितां हीं पाणमांजरें आहेत असें खलाशी लोकांनीं मला सांगितलेले स्मरतें; पण पाण्यांत मांजरें कोठून असणार, या प्रश्नाचा उलगडा खलाशांकडून न झाल्याकारणानें मीं त्यांचे त्या बोलण्यावर विश्वास ठेविला नाहीं; परंतु आतां प्रत्यक्ष

जयपुरांत ते प्राणी पाहिल्यामुळें समुद्रांत चतुष्पद प्राणी ज्यांचें अंगावर लोंकर असते असें आहेत अशी खातरी झाली.

आपण पुष्कळांनीं पुस्तकांत असें वाचलें असेल कीं, आफ्रिका खंडांत ऑस्ट्रीच या नांवाचे पक्षी आहेत. ते उंचीनें मनुष्याचे कंबरे एवढे असून त्यावर कधीं कधीं मनुष्य बसून प्रवासही करितो. हा पक्षी जयपूर येथील कौतुकालयांत मी पाहिला. तो कंबरे एवढा उंच असून त्याचें पाय लहान मुलांचे मनगटा एवढे जाडे आहेत. व त्याजवर मनुष्य बसूं शकेल इतकी त्याची शक्ती असावी असा अदमासही दिसला. लाहोर येथील म्युझियममध्यें तर या पक्षाचा एक जोडा आहे.

मी वर एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, त्या प्रांतांत प्रवासास जाण्याचा ज्यास योग येईल त्यानें जयपूर शहर पाहिल्या वांचून राहूं नये. त्या प्रमाणेंच तेथील सर्व स्थळें पाहिलीं तरी तेथील कौतुकालय पाहिल्यावर त्यास असें वाटेल कीं, या स्थलाचे लेखानें वर्णन करितां येणार नाहीं. करितां या माझें प्रवासाची हकीकत लिहून जेव्हां छापण्याचा प्रसंग येईल, अथवा सांगण्याचा समय येईल, तेव्हां वांचकांस अथवा श्रोत्यांस, इतकीच विनंती करीन कीं, तुह्मीं आपले नेत्र त्यास्थळीं नेऊन लाविल्या शिवाय त्या स्थळाचें चांगूलपणाची योग्यता तुमचे मनांत कधींही बरोबर उतरणार नाहीं. मी या कौतुकालयाचे म्यानेजराचे हेडक्लार्कास भेटून विनंती केली कीं, कौतुकालयाचा कॅटलॉग छापला असल्यास, निदान एक प्रततरी मजला विकत द्यावी. परंतु त्यांनीं नवीन कॅटलॉग तयार होत आहे. सबब तूर्त प्रत देण्यास सवड नाहीं, असें सांगितल्यामुळें, तुह्मांपुढें त्या एकंदर पदार्थांची यादी ठेवितां आली नाहीं त्याची दिलगिरी वाटते.

यानंतर मी जयपूर येथील वर्कशॉप ( यंत्रालय ) पहाण्यास गेलों. येथील सुपरिन्टेन्डेन्ट रामबक्ष चित्रकार यांनीं मला आपला सर्व कारखाना दाखविला. या कारखान्याबद्दल आपणांस मीं थोडक्यांत इतकेंच सांगतों कीं, बडोद्याचें वर्कशॉप किंवा कलाभुवन इंग्रजी धरतीवर आहे; आणि जयपूर येथील वर्कशॉप किंवा यंत्रालय याची रचना आपल्या पौराणिक धरतीवर आहे. या चित्रकारांनीं त्यांचे कारखान्यांत विश्वकर्म्याचे ग्रंथाबाबद शोध व अनुभव चालविला आहे, त्याची यादी मजपाशीं दिली आहे. ती येथें खालीं देतों.

## विश्वकर्मार्जितपुस्तकांची यादी.

१ विश्वकर्मा पुराण.
२ विश्वकर्मा चरित्र.
३ विश्वकर्मा संहिता.
४ वास्तुशास्त्र गिरधरकृत.
५ वास्तुशास्त्र मूर्तिलक्षण.
६ वास्तुविद्या सटीक.
७ शिल्पशिरोमणी.
८ ज्ञानरत्नकोशः
९ अपराजित वास्तुशास्त्र.
१० मानव शिल्पशास्त्र.
११ मायामत.
१२ कला अधिकार.
१३ रूपं एडनं.
१४ विश्वकर्माकोश.
१५ विश्वकर्मा प्रकाश.
१६ वास्तुविचार.
१७ वास्तु एडन.
१८ वास्तु प्रदीप.
१९ चित्रविद्या.
२० शिल्परचना.
२१ समरांगण सूत्रधर सारोधार ( मुज्जादित भटकृत ).
२२ पंचरत्नराज.
२३ परिमाण मंजरी.
२४ भईद्यानसा.
२५ सारदा तिलक.
२६ प्रासादरोकी जतन.

या पुस्तकापैकीं, कांहींचा शोध करून त्या धोरणाचे ( आधारानें ) तेथें यत्न चाललेला आहे. आणि कांहींचा अजून शोध लागला नाहीं. मजला त्यांनीं निघते समयीं जें सांगितलें तें तुम्हां सर्वांस सांगून अशी विनंती करितों कीं, आपल्या जुन्या विद्येचा ज्यांस शोध लावण्याची उत्कंठा असेल त्यांनीं यावर लिहिलेल्या यादीपैकीं, एखाद्या पुस्तकाचा शोध लावून, सदर गृहस्थांस कळविलें असतां, ते मोठ्या प्रेमानें त्याची पुढची व्यवस्था करतील.

जयपूर येथें (नारगड) नांवाचा डोंगरी किल्ला आहे. हा किल्ला शहरापासून ७ मैल दूर असून, त्यांत सरकारी खजिना असतो. व दरसाल पांचलक्ष रुपये त्या खजिन्यांत शिल्लक टाकावी अशी पुरातन वहिवाट आहे असें येथील लोक सांगतात. या किल्ल्यावर ' Wel-Come ' अशीं इंग्रजी अक्षरें इतक्या मोठ्या प्रमाणानें लिहिलेलीं आहेत कीं, तीं जयपुराहून साफ दिसतात. जयपुरी रुपये ब्रिटिश नाण्यापेक्षां पाव अर्ध्या आण्यानें जास्त किंमतीचे आहेत. मी दोन रुपये बरोबर आणिले आहेत, त्याचप्रमाणें जयपूरच महाराजांचा फोटोही बरोबर आणला आहे.

जुनें जयपूर शहर वरील डोंगरावर आहे तेंही पहाण्यासारखे आहे. तेथें " कालिकादेवी " आहे, तीस दररोज एक बकरा बळी द्यावा लागतो. दंतकथा अशी आहे कीं, पूर्वी मनुष्यबळी दररोज प्रातःकाळीं देवीस द्यावा लागत असे. त्या ऐवजीं सध्या देवी बकऱ्यावर संतुष्ट होत आहे.

जयपूर येथील म्युनिसिपालिटीची व्यवस्था फार चांगली आहे. शहरांत नळाचें पाणी विपूल आहे; ड्रेनेज इतका मोठा

आहे कीं, त्यांतून हत्ती जाऊं शकेल. हें ड्रेनेज बांधून नंतर शहर वसविलें अशी दंतकथा आहे.

जयपुरांत महाराष्ट्र मंडळी ज्या भागांत राहते त्यास ब्रह्मपुरी असें ह्मणतात. तें ठिकाण शहरच्या मध्यापासून बरेंच दूर आहे.

माझा प्रवास आगगाडीचे वेगासारखा होता. हें आपण जाणतच आहा. यामुळें जयपूर येथें जास्त मुदत राहून, पुष्कळ स्थळें पहाणें राहिलीं, आणि मी पुढें दिल्लीकडे चालता झालो. मी जयपूर तारीख २६ रोजीं सोडलें, आणि दुसरें दिवशीं वस्तीस दिल्लीस आलो. जयपूर पासून दिल्ली १९१ मैल आहे. हा प्रवास करण्यास बारा कलाक लागतात.

## मुक्काम दिल्ली.

दिल्ली शहरांत अनोळखी मनुष्यास मुक्काम करण्याची जागा ह्मटली ह्मणजे दिल्ली स्टेशनानज़ीक छिनामल्ल खत्री याची धर्मशाळा होय. या सराईच्या अगदीं दरवाजापाशींच यमुनेचा कालवा वाहत आहे. सराईत उतरण्याच्या जागा चार आणे आठ आणे, रुपाया रोजाच्या आहेत. चार आणे रोजाच्या खोलींत निजण्यास खाट मात्र असते. आठ आणे व रुपाया रोजाच्या जागा माडीवर असून, निजण्यास पलंग, दिवाबत्ती वगैरे सोई असतात. या धर्म शाळेंतील देहधर्माच्या जागाही चांगल्या स्वच्छ आहेत. या सराईचा मॅनेजर मौलाबक्ष नांवाचा मुसलमान चांगले स्वभावाचा मनुष्य आहे. उत्तर हिंदुस्थानांत असा रिवाज आहे कीं, सराईत जागेचें भाडे देऊन शिवाय शेतखान्याचें भाडें

निराळें द्यावे लागतें. अलाहाबाद वगैरे प्रदेशांत तर दर खेपेस कोठें कोठें एक एक पैसा द्यावा लागतो. आणि दिल्लीकडे दर माणशी दररोज एक पैसा दिला ह्मणजे झालें. जागेचें भाडें दिलें ह्मणजे त्यांत शौचकुपाचा समावेश होतो अशी प्रवाशाची समजुत असते. व तशीं असणेंही, साहजीक आहे, परंतु शौचकुपांचें (पायखान्यांचें) भाडें निराळें मागतात. यामुळें प्रवाशी व मॅनेजर यांत भानगड पडते. उत्तरहिंदुस्थानांत शौचकुपास तट्टी ह्मणण्याचा प्रघात आहे. बहुतकरून प्रत्येक सराईत एक ब्राह्मण असतो. त्याप्रमाणें याही सराईत एक कनोजा ब्राह्मण होता. आह्मीं आपला मुक्काम जागेंत नीट व्यवस्थेनें लावून, पलंगावर पडलो होतो; इतक्यांत भोजनसंबंधाची व्यवस्था विचारण्यास सदर्हु ब्राह्मण आला. हा ब्राह्मणही चांगले स्वभावाचा आहे. यास भाजी भात चपाती किंवा जें पाहिजे असेल तें सांगावें, ह्मणजे तो स्नान करून तयार करितो आह्मीं खिचडी आणि एक भाजी व एक आण्याचें तूप सांगितलें होतें. त्याचा खर्च स्नानासुद्धां तीन आणे झाला. याप्रमाणे सुमारें १० वाजतां भोजन उरकून मॅनेजर याजपासून घेतलेले कुलुप खोलीचे दारास लावून बाहेर जाण्यास निघालों; इतक्यांत एक मुसलमान आला व अदबीनें सलाम करून ह्मणाला कीं, मी या शहराचा माहितगार (Guide) आहे. आपणास येथील प्रसिद्ध स्थळें दाखविण्यास आपल्या बरोबर येतो. हा मनुष्य चांगला नव्हता असें पुढें आमच्या अनुभवास आलें. यानें दिवसाचें दोन रुपये सांगितलें. ना, हो, करितां रुपया रोज ठरला परंतु आठ आणे, चार आणे, रोजांनीं अशीं माणसें मिळतात. मात्र मॅनेजरकडे तपास केला पाहिजे. मनुष्य परभारें ठरवूं नये. घोडा, गाडी, अगर तांगा भाड्यानें

करणें तर या शहराच्या माहितगार (Guide) चे मार्फत करूं नये. कारण गाडीवाल्यापासून तो चिरीमिरी अगर कमिशन घेतोच तें कमिशन व खरें भाडें मिळून गाडीवान भाडें सांगतो. गाडीचें बाबतींत आह्मीं खबरदारी ठेविली होती. (guide) ने पांच रुपये रोज प्रमाणें गाडीचें भाडें बसतें असें सांगितलें. बाहेर गेल्यावर आपण गाडी ठरवूं असें मी त्यास उत्तर दिलें. "तुह्मीं कशाला उगाच तसदी घेतां" अशी त्यानें पुष्कळ रदबदली केली पण आह्मीं ऐकतो आहों कशाला ? त्याजबरोबर बाहेर पडतो. आणि थोडें पुढें गेलो नाहीं तों भाड्याचें अनेक तांगें "शिग्राम दृष्टीस पडले. आह्मी गाडी केली तिचा दर, पहिल्या तासास आठ आणे आणि पुढें दर तासास चार आणे याप्रमाणें ठरवून गाडींत बसलो. नंतर माणीक चौकांतून व कांहीं कचेऱ्या पाहून तसेंच दिल्लीचा किल्ला पाहाण्यास पास मिळविण्याकरीतां कमॅन्डिंग ऑफिसराकडे गेलो. हा पास देण्याचा नियम असा आहे कीं, गाडी दोन चाकांची असल्यास दोन आणे व चार चाकांची असल्यास चार आणे फी द्यावी लागते. तेंव्हां पास मिळतो नंतर तो पास मिळतांच गाडींत बसून किल्ल्याचे दरवाजापाशी आलो आणि पाहाऱ्यावरील सोलजरापासी पास देऊन आंत शिरलो. प्रथम तो आंतील विस्तीर्ण प्रदेशाचा भव्य देखावा पाहून मन चकित झाले. बादशाहा बसण्याचा मयुरासनाचा दिवाणखाना पाहिला तो फारच सुशोभित आहे परंतु सध्यां तेथें मयूरासन मात्र नाहीं. ते तेथून काढून विलायतेस नेले असें सांगतात या दिवाणखन्याचे भिंतीवर काढलेल्या सोनेरी वेलबुट्या व आकृती जशाच्या तशा आज मितीस चकाकत आहेत. त्या वेलबुटींतील पानें हिरव्या रंगाचीं आंत हिरवे दगड बसवून

अगदीं हुबेहुब बनविलेलीं आहेत. तीं इतकीं कुशलपणानें तयार केलेलीं आहेत कीं, आग्राचे ताज महालांतील नकशी देखील यापेक्षां सुबक असेल, असें वाटत नाहीं. ( मीं ताजमहालही पाहिला आहे. तांबडीं माणिकें, पुष्कर पाच वगैरे खडे ठिकठिकाणीं या वेलबुटींत पुष्कळ बसविलेले आहेत व कांहीं ठिकाणचे काढूनही नेलेले आहेत, तेथें खाडे पडलेले दिसतात. हा दुर्वृत्तपणा युरोपियन बालकांनीं केला असें आमचा वाटाड्या सांगत होता. ह्या दिवाखान्यापलीकडे बादशहाचा एक आराम करण्याचा दिवाणखाना आहे, त्यांत फारशी भाषेंत खालील वाक्यें आहेत:— " गरफर दोसबर रूबे जमीन अस्त, हमीनस्तू हमीनस्तू " मृत्यू लोकीं स्वर्गसुख असलें तर तें याच ठिकाणीं आहे, किंवा दुसरें स्वर्गसुख वरतीं आहे, या शिवाय दुसरे ठिकाणीं असें सुख कोठेंही नाहीं, असा या वाक्याचा अर्थ आहे. हा दिवाणखाना पाहिल्यावर मग न्यायदरबारांत आपण जातों. यास " इन्साफ अदालत " असें ह्मणतात. या दिवाणखान्यांत न्यायाधिशाचे व सर्व लोकांचे दृष्टीस पडेल अशी भिंतीवर मोठी तराजू काढलेली आहे. याचा हेतू:—येथें जो अद्ल ( खरा ) न्याय तोच दिला जातो, असा आहे; परंतु त्याचा अमल जुन्या अमदानींत किती होत असें हें आपल्यास इतिहास सांगत आहे.

माझे दिल्ली शहर पहाण्याचे जे हेतू होते, त्यांत दोन बाबतींचा शोध लागला तर करावा असें मनांत होतें. पहिला:— छत्रपती शिवाजी महाराजांस अवरंगजेबानें अटकेंत ठेविलें होतें, तें कोणत्या स्थळीं ? दुसरा, बाळाजी विश्वनाथ पेशवे व रामचंद्रपंत भानु हे चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा पक्या करून घेण्या-

करितां व तीर्थरूप गंगाभागिरथी मातोश्री येसू बाईसाहेब यांस परत नेण्याकरितां आले होते, ते दिल्लीहून परत जातांना शहरकोतवालाचे लष्कराची व मराठ्यांची जी झटापट झाली ती कोणत्या स्थळीं झाली याचा शोध करावा. छापील इतिहासांत या कामीं दिल्ली येथें भानूंचा एक पुरुष खर्चीं पडला इतकी मात्र हकीकत प्रसिद्ध आहे.

कलकत्याचें ब्लॅकहोल कोठें होतें, याचा थोडासा शोध लागल्याचें अलीकडे वर्तमान पत्रांत आपण वाचल्याचें तुह्मांस स्मरण असेलच; पण ती गोष्ट शोधक इंग्रज लोकांची, सबब त्यांनीं शोध लाविला. आम्हांस तर असे प्रकारची ऐतिहासिक माहिती मिळविण्याची संवयच नाहीं. तशांत या बाबतींत शोध करण्याची ज्यास इच्छा असेल त्यानें दिल्ली शहरांत महिना पंधरा दिवस तरी मुक्काम केला पाहिजे. तेथील जुन्या लोकांत मिसळलें पाहिजे. त्यांच्या तोंडच्या दंतकथा ऐकिल्या पाहिजेत. असे यत्नानें सदर स्थळाचा कांहीं छडा लागला तर लागावयाचा. मज सारख्या आगगाडीचे वेगानें प्रवास करणारास मागमुस लागण्याचा फराच थोडा संभव आहे. किल्यांतील एके बुरुजास दख्खन बुरूज असें ह्मणतात, असें एका वृद्ध मनुष्यानें सांगितलें. मग तो बुरूज दक्षिणेकडील ह्मणून, अगर येसूबाई त्या स्थळीं राहत होत्या, ह्मणून त्यास हें नांव पडलें, हें कांहींच समजत नाहीं.

छत्रपती श्री शिवाजी महाराज अवरंगजेबाचे अटकेंतून कसे परत आले, ही हकीकत इतिहासांत प्रसिद्ध आहे, सबब त्याविषयीं येथें उल्लेख करण्याचें कारण नाहीं. परंतु शाहू महाराजांचे कारकीर्दींत बाळाजी विश्वनाथ व रामाजीपंत भानु ( यांस

कांहीं ठिकाणीं बाळाजीपंत भानु असेंहीं ह्मटलें आहे) लवाजम्यासह चौथाई सरदेशमुखीच्या सनदा व तीर्थस्वरूप गंगाभागीर्थी मातोश्री येसूबाई साहेबांस परत आणण्याकारितां गेले होते. व तेथें त्यांनीं दोघां सय्यद बंधूंचा तंटा मिटविल्यामुळें बादशहाची त्यांजवर मर्जी जास्त खुष झाली होती. याजमुळें ते आपला कार्यभाग करून कसे परत आले, याची साद्यंत हकीकत ज्यांस आपण जिवंत लायब्रेरी असें म्हणत होतों, त्यांजकडून म्हणजे, स्वर्गवासी सरदार गोपाळ राव हरी देशमूख यांचे मुखानें समजलेली, ती येथें नमूद केली असतां अप्रासंगिक होणार नाहीं, सबब लिहितों.

अवरंगजेबाचे मरणानंतर त्याचा पुत्र दक्षणेंतून दिल्लीस जातेसमयीं शाहूमहाराजांस परत साताऱ्यास थोडी फौज देऊन गादीवर बसण्यास पांठविलें. तेसमयीं चौथाई सरदेशमुखीच्या कच्या सनदा मराठ्यांपाशीं आहेत, त्या सनदा तूमचें वर्तन पाहून पक्या (ह्मणजे दिल्लीच्या दरबारच्या दफ्तरांत बार करून) पाठवून देईन असेंही कबूल केलें होतें. व शाहूमहाराजांनीं भानगडी करूं नयेत ह्मणजे दक्षिणेंतील मोंगल सरदारांशीं लढायावगैरे मारण्याच्या फंदांत पडूं नये, ह्मणून शाहूचे मातोश्रीस बरोबर दिल्लीस (ओलीस) नेले होतें पुढें कांहीं काळानें दिल्लीस दोघां सय्यद बंधूंत इतका बेबनाव वाढला कीं, त्यांचे भांडणानें दिल्लीचे गादीचा काय परिणाम होतो; याची बहादूरशहास मोठी पंचाईत पडली. सबब दक्षिणेंतून मराठ्यांस मदतीकारितां बोलाविलें, (अवरंगजेब व त्याचे पुत्र दक्षिणेंत मराठ्यांशीं लढत असतां मराठ्यांचे शौर्याची व दृढनिश्चयाची पूर्ण खातरी झालेली होतीच. याची

साक्ष शाहूला सोडून देणें व दिल्लीस मराठ्यांस मदतीकारितां बोलावणें या दोन गोष्टी होत. ) शाहूमहाराजांनीं या कामाकारितां बाळाजी विश्वनाथ व रामाजीपंत भानु यांस नेमिलें. यावेळीं महाराजांनीं बाळाजी विश्वनाथ यांस दोन महत्वाचीं कामें करून येण्याविषयीं सांगितलें होतें. तीं कामें कोणतीं ह्मणाल तर १ लें. चौथाई सरदेशमुखीच्या पक्कया सनदा करून देण्याचें बहादूरशहानें जातेसमयीं कबूल केलें होतें, त्या आणणें, २ रें—श्रीमंत गंगाभागीर्थी मातोश्री येसूबाई साहेब यांस परत आणणें. बाळाजी विश्वनाथ आपल्या लष्करासह दिल्लीस दाखल झाले आणि फारसा रक्तश्राव वगैरे न होऊं देतां त्या दोघां वजनदार सरदारांचा ( सय्यद बंधूंचा ) सलोखा करून टाकला, त्यायोगें दिल्ली दरबारांत मराठ्यांचें बरेंच वजन वाढलें. व बहादूरशहाची बाळाजीवर पूर्ण कृपा झाली, सबब मराठ्यांच्या दोन्ही मागण्या बादशहानें कबूल केल्या; पण दरबारचें मुत्सदी मंडळ याच्या अगदीं विरुद्ध होतें, सबब दिनावधि लागेल असें धोरण दिसूं लागलें व मुत्सदी मंडळीनेंही बाळाजीस थोडे लोक ठेवून सर्व लष्कर परत पाठविण्याची सल्ला दिली. त्याप्रमाणें थोडे लोक ठेवून घेऊन बाळाजीनें फौज परत पाठवून दिली, ( यावेळीं दिल्ली दरबारचा बंदोबस्त कशाप्रकारचा होता व तेथें कशी अंदाधुंदी चालत होती याचें स्वरूप पुढें लिहिलेल्या हकीकतीवरून सहज ध्यानांत येईल ). बादशहाचा मराठ्यांस दोन्ही बाबतींत सहाय करण्याचा दृढनिश्चय पाहून त्या कपटपटू मुत्सदी मंडळानें अशी गुप्त मसलत केली कीं, सनदा व येसूबाईस घेऊन मराठे दिल्ली दरवाजाबाहेर थोडे अंतरावर गेले कीं, त्यांजवर हल्ला करून सर्वांची कत्तल करून

टाकावी व ही खबर बादशहाचे कानावर न जाण्याविषयीं सक्त बंदोबस्त ठेवावा. हें काम त्यांनीं शहर कोतवालावर सोपिलें. याप्रमाणें मसलत झाल्यावर मग मराठ्यांस थोडे काळानें सनदा मिळाल्या व गंगाभागीर्थी मातोश्री येसूबाई साहेबांसही बरोबर घेऊन जाण्याचा परवाना मिळाला.

बाळाजीसही या गुप्त मसलतीची खबर लागली व तीखरी असल्याबद्दल दरबारच्या मंडळीचें पूर्वीचें वर्तन त्यानंतर सनदा मिळण्याचे बाबतींत जें विरुद्ध होतें तें अनुकूल झालें, त्याजवरून त्याची पूर्ण खात्री झाली कीं, यांत कांहीं तरी दगा आहे. नंतर त्यांनीं ही सर्व हकीकत आपला जिलग मित्र भानु यांस निवेदन केली असतां दोघांसही या संकटांतून चिंतीत कार्य भाग उरकून पार कसें पडावें याचा मोठा विचार पडला. परम प्रतापि श्री छत्रपती महाराजांवर असेंच संकट आलें होतें; पण मराठी राज्याची कुलस्वामिनी प्रतापगडची "श्री भवानी" तिनें ज्या प्रमाणें महाराजांस सहाय करून त्यांस निर्वेध दक्षिणेंत परत आणून सोडिलें, तीच श्री भवानी आपणासही यावेळीं सहाय करून या आलेल्या विघ्नांतून पार पाडील असें मनांत योजून दोघेही देवघरांत गेले आणि तिचें तेंथे स्तवन केल्यावर तिचे सहायानें असें ठरविलें कीं, दोघांपैकीं एकानें मिळालेल्या सनदा व श्रीमंत गंगाभागीरथी येसूबाईसाहेबांस गुप्त रीतीनें घेऊन निघून जावें आणि सुरक्षित रीतीनें योग्य स्थळीं पोंचल्याची खबर आली कीं, प्रसिद्ध रीतीनें दुसऱ्यानें निघून यावें. यांत मागाहून येणाराचा प्राणनाश व्हावयाचाच यांत संशय नाहीं; हें निश्चित

होतें. पण गुप्त रीतीनें कोणीं जावें याजबाबद त्या दोघा मुछद्यांत मतभेद पडला*. बाळाजी विश्वनाथ ह्मणत मी प्रसिद्ध रीतीनें येतों व तुह्मीं गुप्त रीतीनें जावें. भानूचें ह्मणणें या विरूद्ध पडलें. भानूनीं अशीं कारणें सांगितलीं कीं, तुमचा बाजिराव व चिमणाजी हें आतां तुकतेच तुमचे सहवासानें शूरत्वाचे कामांत व धनुर्विद्येंत तयार होत चालले आहेत. असाच तुमचा त्यांस सहवास झाला तर ते मोठे शूर योद्धे निपजतील यांत अगदीं संशय नाहीं. सृष्टीनियमाप्रमाणें बाप होणें घरोघर दृष्टिस पडतें; परंतु बाप आणि गुरु यांचे अधिकार पित्याकडे उत्पन्न होणें अशीं उदाहरणें फारच कचित् दृष्टीस पडतात. त्याप्रमाणें आपलें उदाहरण आहे आणि असे प्रकारें ते रामलक्ष्मण तयार झाले तर पुढें मराठ्यांचे सत्तेचे झेंडे अटकेंपर्यंत लागतील यांत अगदीं संदेह नाहीं. याजकरितां माझी विनंती मान्य करून मलाच प्रसिद्धपणें येण्याची परवानगी द्यावी आणि आपण मातुश्री येसूबाईसाहेब व सनदा घेऊन निर्विघ्नपणें दक्षिणेंत जावें. मीं

---

* याजबाबद वाचकांचे मनांत सांप्रतचे आमचे देशाचे पुढाऱ्यांत किंवा युनीवरसिटीचा डिप्लोमा मिळविल्यांत जशा प्रकारचा मतभेद पडतो. ह्मणजे विधवांचा पुनरविवाह करणें न्याय आहे परंतु तुह्मीं करा आह्मीं ( कर्तव्य ) आहे असें म्हणू, पण स्वतः करणार नाहीं व करणराचे पंक्तीस जेवणार नाहीं. आह्मी ' कासमापालिटन ' क्लबचे मेंबर होऊन हवातसा भोजनाचा (मग दोनपायाचा ह्मणू नका चार पायाचा ह्मणु नका ) लाट मारू पण जरका ही गोष्ट तुह्मीं दुसऱ्यास सांगितलीत तर आह्मीं प्रथम नाकबूल करूं. आणि जातीनें बहिष्कार घालण्यापर्यंत मजल आणली तर शेण मुत खाऊन पवित्र होऊं धिकार, धिकार, धिकार! "तुका ह्मणे ऐशा नरा, बांधून माराव्या पैजारा" अशा प्रकारचा मतभेद पडला नव्हता.

शौर्य दाखविल्याशिवाय जमिनीस पाठ लावणार नाहीं, हें आपणास निश्चयानें सांगतों आणि कदाचित् रणांत पडलों तरी चिंता नाहीं. त्या योगें अखंड स्वर्गवास तरी मिळेल. दहाजण मेले तरी चिंता नाहीं; पण दहाजणांस शूर बनविणारा पुरुष मरतां कामा नये. याकरितां सांगतों कीं, प्रसिद्धपणें जाण्याचा माझा कृतसंकल्प झाला आहे, तो मी शेवटास नेणार. आजपासून तुह्मीं माझे पुत्राचे बाप व्हा, त्यास आपल्या सहवासास ठेवा, माझे कुटुंबाचा परामर्ष आजपर्यंत घेत आलां आहां त्याचप्रमाणें पुढें घेत जा. (मॉरल क्लासमध्यें दोघे बंधूंची गोष्ट आहे कीं, "एक ह्मणे छे तसें नाहीं. सोडतीप्रमाणें मी मरणार. दुसरा ह्मणे नाहीं, तसें कसें होईल? तुझेकरितां मी मरणार आणि शेवटीं पहिल्याचे बदली दुसऱ्यानें समुद्रांत उडी टाकली" तसाच प्रकार येथें झाला.) बाळाजीस भानूचा निश्चय मान्य करावा लागला व त्याप्रमाणें बाळाजी विश्वनाथ गंगाभागीरथी मातुश्री येसूबाईसह चौथाई सरदेशमुखीच्या सनदा घेऊन दक्षिणेंत येण्याकरितां निघाले आणि नंतर प्रसिद्धपणें नेमिलेल्या दिवशीं भानु निघाले. भानु बरोबरील येसूबाईचे मेण्यांत एक शूर मराठा योद्धा स्त्रीचा वेश घेऊन हत्यारबंद बसला होता. मोंगलांनीं नेमिलेल्या ठिकाणीं शहराबाहेर स्वारी येतांच त्यांजवर एकदम हल्ला केला. त्या झटापटींत भानु पडले व वेषधारी येसूबाईचे मेण्यास शहर कोतवालानें तावडतोब आपल्या जनानखान्यांत पाठवून दिलें. तेथें त्या वीरानें आपल्या शौर्यानें त्या पडदेसिन स्त्रियांत बराच गोंधळ केला व त्या योगें कोतवालास आपल्या नीच बुद्धीबाबत पश्चातापांत पडणें भाग झालें.

याप्रमाणें हकीकत स्वर्गवाशी सरदार गोपाळराव हरी देशमुख यांचे मुखानें ऐकीली ती येथें दिली आहे. गोपाळरावजी यांजकडे इनाम कमिशन संबंधानें पेशव्यांचें दफतर तपासण्याचें काम कांहीं वर्षे होतें हें प्रसिद्धच आहे, सबब त्याजकडून कळलेली हकीकत बरीच विश्वासनीय असेल असें मानल्यात चुकी होणार नाहीं.

मी बसलों होतों ती आगगाडी प्रातःकाळीं पांच वाजण्याचे सुमारास दिल्ली स्टेशनावर आली, आणि मुक्कामाची जागा नजीकच होती, सबब मजुराचे डोकीवर बोजा देऊन निघालों, दिल्ली शहरांतीलच बोजेवाला तो! इतका मंदगतीनें चाले कीं, साधारण चालणारा देखील सहज त्याचे पुढें जाईल. पण माझा प्रवासांतील नियम असा आहे कीं, ओझेंवाल्याचे पुढें कधीं चालावयाचें नाहीं. यामुळें त्याची चालण्याची जी गति होती त्याप्रमाणें मलाही चालावें लागलें. हा माझा नियम प्रवास करणारांस सक्त पाळण्याविषयीं मी विनंती करितों. पुणें, मुंबई वगैरे सारख्या मोठ्या शहरीं प्रवासी गेला ह्मणजे तेथील बाजार व उंच इमारती प्रवाशाचें मन तेव्हांच आकर्षण करून टाकितात. अशी संधी पाहुन "दादा बिगी बिगी चला कीं," असें बोजेवाला ह्मणत असतो आणि जर त्यांस मागून प्रत्युत्तर मिळालें नाहीं तर हलकेच मागें पाहतो आणि संधी पाहून पटकन नजीकचे गल्लींत पोबारा करितो. जरी मजुराचे मागें चालण्याचा आपला निश्चय असला तरी सुईमागें दोरा या ह्मणी प्रमाणें वर्तन ठेविलें पाहिजे. नाहीं तर मोठमोठे शहरीं पादचारी लोकांची जी रस्त्यांत गर्दी असते तीमध्यें येऊन प्रवाशाचे दृष्टीस ग्रहण लागतें.

इतक्यांत तो राहुरुपी "गठिया" गाठोड्यासह खग्रास होऊन जातो. मग हे हैबतराव हैबत घेऊन "वस्त्रदान,--धातूदान,--सुटेगिराण" याप्रमाणें गांठोड्यांत असलेल्या वस्तूंचें वर्णन करीत वेड्यासारखे होऊन जातात. ही गोष्ट प्रवास करणाराचें मनांत चांगली ठसावी ह्मणून जरा पाल्हाळानें लिहिली आहे.

आगगाडींत असतां जेव्हां गाडींतील लोक बोलत कीं, आतां पुढील स्टेशन दिल्लीचेंच येणार. ते समयीं पाझे मनांस एक प्रकारचा उल्हास प्राप्त होत असे, व असें वाटे कीं, ती राजधानी मी केव्हां पाहीन. पुढें रस्त्यांतून चालतांनाही माझें मन ऐतिहासिक विचारांत अगदीं तल्लीन होऊन गेलें होतें. ज्या शहराचे भूमीवर अनेक उलढाली, राज्यक्रांत्या व राज्यस्थापना झाल्या, जेथें आमच्या परमप्रतापी छत्रपती शिवाजी पहराजांस मोंगलांनीं विश्वासानें बोलावून नंतर विश्वाघातानें अटकेंत ठेवलें, परंतु तेथूनही त्या चतूर पुरुषानें आपल्या पुत्रासह मोंगलांचें हातावर तुरी देऊन आपली सुटका करून घेतली. ज्या स्थळीं बाळाजी विश्वनाथ पेशवे व रामचंद्रपंत भानु हे दोघां सय्यद बंधूंचा लढा तोडण्याकारितां आले होते व परत येतांना मोठे कर्तबगारीनें आपला मुख्य कार्यभाग शेवटास नेते झाले. आमच्या पौराणिक इतिहासाकडे पाहिलें तर जेथें द्रौपदीचें नेसलेले वस्त्र तिचे पतीसमक्ष हाजर असतां देखील तो दुरात्मा दुःशासन तें फेडण्यास प्रवृत्त झाला; तरी ज्या पंडुपुत्रांनीं केवळ आपल्या वचनाचा भंग न करण्याकारितां सर्व कोप गिळून टाकला. कितीही मानहानी झाली व शेवटीं प्राणत्याग जरी झाला तरी चिंता नाहीं, पण वचन भंग होऊन द्यावयाचा नाहीं. आपल्या वचनाचे

ठायीं स्थीर चित्तानें उभें रहावयाचें. अहाहा !! केवढी तरी मोठी अचल मनोवृत्ती ही ! गोपालकृष्णानें अनेक प्रकारें समजूत घातली कीं, " कर्णा, तुला राज्याभिषेक होईल. धर्मार्जुनादी तुझे डोकीवर छत्रचामर धरतील. द्रौपदीसारखी रूपयव्वनसंपन्न स्त्री तुला विभागाप्रमाणें उपभोगण्यास मिळेल, याकरितां तूं पांडवांचा पक्ष स्वीकार, " अशाप्रकारें सर्व निवेदन केलें असतांही ज्यानें शेवटीं हेंच उत्तर दिलें कीं, " ज्याचे अन्नानें हा देह वाढला, ज्याला मीं आपला राजा असें कबूल करून प्राणत्याग होई पावेतों तुजकरितां लढेन असें वचन दिलें, तें वचन पाळण्यांत मनास जें सुख व आनंद वाटतो त्यापुढें त्या हस्तनापूरची गादी, ती द्रौपदी मी यःकश्चित समजतों. " असें स्पष्टपणें सांगणारे वीर ज्या भूमींत ( हस्तनापुरींत अगर दिल्लींत ) निर्माण झाले ती भूमी— ( नगरी ) माझे दृष्टीस पडणार केवढें तरी माझें भाग्य आहे असे विचार मनांत येऊन मन आनंदसमुद्रांत बुचकळ्या मारीत होतों.

ता० २४ दिसेंबर सन १८९४.

### मुक्काम लाहोर.

लाहोर ही पंजाबाची मुख्य राजधानी होय. आह्मी स्टेशनावर गेल्यावर स्वागत कमिटीकडून आह्मास नेण्याकरितां गाड्या व माणसें तयार होतींच. आह्मीं गाडींत बसून "अनार्कली मोहल्यांत " मुंबईब्लाकमध्यें येऊन उतरलो. तेथें कॉंग्रेसचे डेलिगेटांकरितां ज्याप्रमाणें हरएक ठिकाणीं व्यवस्था असते त्याप्रमाणें सर्व व्यवस्था होती. लाहोरचें स्टेशन अशा प्रकारें बांधलेलें आहे कीं, तें राजकिय किल्ल्यासारखेंही उपयोगीं पडावें.

लाहोर शहर बरेंच मोठें आहे. हें शहर रावी नदीचे कांठीं वसलेलें आहे. ही नदी शहरास अगदीं लागून होती, परंतु थोडे वर्षांपूर्वीं एके वेळीं महापूर येऊन तिचा जो ओघ बदलला तो बदललाच. याचा परिणाम असा झाला आहे कीं, पुष्कळ पैसे खर्च करून सरकारनीं नदीवर पूल बांधला होता, तो आतां कोरड्या जागेवर राहून नदी तेथून पलीकडे गेली आहे असा चमत्कार झाला आहे. मागील बादशाही कारकीर्दींतील चांगलीं चांगली कामें लाहोरांत बरींच आहेत.

'अनार्कली'—ह्मणजे ज्या भागांत आह्मी मुंबई इलाख्याचे लोक उतरलों होतों येथें एक पंचरसी धातूची भली मोठी तोफ पडलेली आहे. हिचा इतिहास असा आहे कीं, सन १७६१ त 'अहमदशहा' काबूलचा बादशहा ज्या समयीं पेशव्यांबरोबर लढाई करण्याकरितां हिंदुस्थानांत आला व जी लढाई सोनपत पानपत येथें झाली, ते समयीं ही तोफ त्यानें ओतविली होती, ती परत जातांना मोठमोठ्या डोंगरांतून नेतां येणार नाहीं, सबब लाहोरास टाकून दिली. पुढें ती शीख लोकांनीं आपले कबजांत घेतली व तीस हल्लीं तद्देशीय लोक 'भजियनवाली' (बजरंग) तोफ असें ह्मणतात. जहांगीरचा दर्गा म्हणून एक विस्तीर्ण कबर लाहोर येथें आहे. या कबरीचे चारी बाजूस उंच मनोरे आहेत, पैकीं एका मनोऱ्यावर आम्हीं कांहीं मंडळी गेलो होतो. या मनोऱ्यास चढावयाच्या २८० पायऱ्या आहेत. या मनोऱ्यावरून शहरचा देखावा फारच उत्कृष्ठ दिसतो. मुग्यांचे वारूळांत जशी व्यवस्था असते तशीं तीं भोंवतालचीं घरें मधून रस्ते व त्यांतून चालणारीं चिमुकलीं माणसें पाहून मनुष्य जो आपल्यास

सर्व जीवजंतूंपेक्षां मोठा ज्ञानवान असें ह्मणतो तें कितपत खरें असेल याची कल्पना मनांत येते. या मनोऱ्यावरून रावी नदीचा प्रवाह, पाण्याची त्या अफाट मैदानांतून चालण्याची मंद गती पाहून सृष्टीकर्त्याच्या कौतुकाची मौज वाटते.

याच्या नजीकच रणजीतसिंगाचें मृतस्थान व त्यावर बांधिलेली छत्री आहे. या छत्रीनजीक रणजीतसिंगाबरोबर सती गेलेल्या राण्यांचीं थडगीं आहेत. छत्रींत मध्यभागीं कबरीसारखा उंचवटा असून त्यावर मौल्यवान वस्त्रें ठाकिलेलीं आहेत व दर्शनास येणारे लोक त्यावर फुलें वगैरे टाकितात. भोंवतालीं शीख लोकांचे गुरू बसलेले असतात. त्या उंचवट्यापुढें आह्मी गेलों ते समयीं तीनचार गवई गात होते व तुपातेलाचे नंदादीप तेवत होते. या छत्रीच्या माडीवर गेलें ह्मणजे भिंतींवर शीखधर्माचीं चित्रें व रामचंद्र, अर्जून वगैरेंचीं चित्रें त्या देशांतील पेहेरावासह काढलेलीं आहेत. रणजीतसिंग यास इतिहासांत "The lion of Punjab" पंजाबचा सिंह असें ह्मणतात तें अगदीं खरें आहे. शीख लोक तसेच पाणीदार आहेत, ह्मणूनच त्यांनीं मोंगलांपासून आपल्या देशाचें संरक्षण करून घेतलें होतें.

रणजीतसिंगाचे छत्रीची शीख लोकांनीं जी उत्तम रीतीची व्यवस्था ठेविली आहे व त्यांचेठाईं जी त्याजविषयीं सान्मानबुद्धि आहे ती अगदीं योग्य आहे. पण ही सर्व व्यवस्था पाहून मला आमच्या मराठ्यांच्या वर्तनाविपर्यासाचें स्मरण होऊन फार खेद झाला. रणजीतसिंगानें आपल्या पराक्रमानें पंजाब देशाचें वैभव राखिलें. आमच्या छत्रपती शिवाजी महाराजांनीं तर आपली

गेलेली सत्ता मोंगलांपासून हिरावून घेऊन मराठ्यांची गादी स्थापिली आणि नंतर पहिल्या बाजिरावांनीं त्या गादीची सत्ता चोहोंकडे पसरली. पण या दोन्हीही महापुरुषांचे मृतस्थानाबाबात आमचें वर्तन कसें आहे, हे विचार मनांत आणिले ह्मणजे आमच्या आणि शीख लोकांच्या वर्तनांत जमीन अस्मानाचें अंतर दिसून येतें. कारण या दोन्ही योध्यांचे मृतस्थानाची सांप्रत कशी दैना आहे; याबदल मी त्या स्थळीं जाऊनत्याचे हकीकतीचीं पुस्तकें छापून प्रसिद्ध केलीं आहेत त्यावरून सर्वांचे ध्यानांत येईल.

अमदाबाद सोडलें कीं तुमचे दृष्टीस कऊल पडावयाचें नाहीं. ती स्थिति तहत लाहोरपर्यंत व त्याचे पुढें सुद्धां सर्व घरें दगडी व वरील भागावर गच्च्या अशीं दृष्टीस पडतात. लाहोरांत रस्त्यांतून स्त्रिया जातां येतां अगदीं दृष्टीस पडावयाच्या नाहींत. कदाचित क्वचित प्रसंगीं स्त्रिया बाहेर पडल्या तर मुसलमान असल्यास डोक्यापासून पायापर्यंत झगा असावयाचा. कपाळावर मात्र चार बोटें जाळी असते, त्या जाळींतून सर्व जग पहावें. चालतांना पायाखालीं एखादा खड्डा आला तर धरणी मातेला आपल्या दुःखद स्थितीबदल साष्टांग नमस्कारही घालावा; आणि हिंदू असली तर लांब रुंद अंगावर वस्त्र असावयाचें; परंतु अशा स्त्रिया देखील फार क्वचित दृष्टीस पडावयाच्या. एखादे वेळीं खेड्यापाड्यांतील स्त्रिया आमच्या दृष्टीस पडत पण त्यासुद्धां फारच क्वचित प्रसंगीं. पंजाब प्रांतांतील पुरूष काय व बायका काय फारच सुस्वरूप असतात. बसकें नाक, डोळे बारीक असा एकही मनुष्य आमचे दृष्टीस पडला नाहीं. माझा अंदाज असा आहे कीं,

आर्य लोकांच्या चेहेऱ्यांचें जें वर्णन लिहिलेलें आहे, तशाच प्रकारचे बहुतकरून सर्व लोकांचे चेहेरे येथें दृष्टीस पडतात. इकडील लोकांचा वर्ण गोरा असून लोक दिसण्यांत सुकुमार दिसतात. कसबिणीचीं दुकानें इतकी आहेत कीं, आमचे दररोज कॉंग्रेसला जाण्याचे रस्त्यावर वीस पंचवीस घरें टाकलीं कीं, एक विश्वयोषिता काबुली पोशाख केलेली खिडक्यांचे पुढें काढलेल्या बसण्याचे जागीं तक्याशीं टेकून बसलेली दृष्टीस पडावयाचीच. त्यांच्या त्या गोऱ्या तोंडावरील लाली इतकी मिश्र झालेली असते कीं, आपण मडमांचीं कांचेचीं चित्रें विकत घेतो, त्या चित्रांचे गालावर ज्याप्रमाणे लाल रंगाची छटा असते त्याचप्रमाणें त्यांचे तोंडावरही लाल छटा दिसत असे तो पीतवर्ण मिश्र गोरा वर्ण त्याजवर नैसर्गीक रीतीनें उठलेला लाल शिडकाव असा चेहेरा पाहून मनास मोठा आल्हाद होत असे. एकंदरीनें मीं जें वर म्हटलें आहे कीं, तिकडील लोक फार स्वरूपवान असतात, तें अगदीं खरें आहे. अजमिरांत मांस विकण्याचीं दुकानें पडद्याआड असत. हीच रीत जयपूरपर्यंत दृष्टीस पडली. पण लाहोरांत मांस विकण्याचे दुकानास असा पडदा वगैरे कांहींएक नसतें. इतकेंच नाहीं तर साधारण भाजीपाल्याप्रमाणें मांस विकण्याचीं दुकानें सर्व रस्तोरस्तीं आहेत. ठिकठिकाणीं बकऱ्यांचीं डोकीं व आंतडीं अगदीं भररस्त्यावर लोक विकावयास बसतात व ब्राह्मण वगैरे लोक खुशाल विकत घेतात. बहुतकरून आपल्या इकडच्या रीतीप्रमाणें तिकडे खाणावळी नाहींत. ज्यास भोजन करावयाचें असेल त्यानें दुकानावर जावें. पुऱ्या, भाज्या, लोणचीं जें पाहिजे तें घेऊन खावें. लाहोरांत अशीं दुकानें अनेक आहेत. व त्या दुकानांतून अनेक लोक खात बसलेलें दृष्टीस पडतात.

अमृतसर येथें शोध करितां असें समजलें कीं, इकडील प्रदेशांत घरोघर स्वयंपाक करण्याची रीतच नाहीं. अगदीं उच्च प्रतीचे अगर अगदीं हलके प्रतीचे लोक ( कोद्रा वगैरे खाणारे ) हे मात्र घरीं शिजवून खातात. बाकीचे लोक आपल्या घरच्या माणसांसह दुकानदाराबरोबर दरमहा बांधून टाकितात. दुकानदार नेमलेल्या वेळीं दोन्हीं सांज घरीं भोजन पोंचतें करतो. कोणी पाहुणा आला असल्यास व त्यास विशेष प्रकारचें भोजन घालणें असल्यास तशी वर्दी देतात ह्मणजे तें पक्वान्न येतें. याप्रकारें घरीं स्वयंपाकाची भानगड नसल्यामुळें घरांतील स्त्रियांचा पुष्कळ वेळ वांचतो. त्याचा उपयोग मजुरीकडे करितात. स्त्रिया बसल्या बसल्या गळपटे तयार करितात. मजुरीनें शाली आणून त्यांवर फुलें, वेलबुट्टी काढणें वगैरे सर्व कामें स्त्रियाच करितात. हे धंदे कुशल स्त्रियांचे झाले. हलक्या स्त्रिया दळण कांडण मजुरीनें करितात. आणि सायंकाळीं व्यापारी आला कीं, त्याचें पदरांत सर्व माल घालतात. याप्रमाणें तिकडील स्त्रिया व पुरुष उद्योगांत अगदीं निमग्न असतात. अमृतसर येथें शालींचा मोठा व्यापार चालतो. आपल्याकडे येणाऱ्या शाली याच प्रदेशांतून येतात. अमृतसर येथें सोनेरी मुलाम्याचें शीख धर्माचें मुख्य देऊळ आहे. त्यास इंग्रजींत (golden temple) सोनेरी देऊळ असें ह्मणतात. हें देऊळ एका विस्तीर्ण तलावाचे मध्यभागीं असून चोहोंबाजूंस चार रस्ते आहेत. सदरहु देऊळाचा नकाशा या सोबत जोडला आहे. या देऊळाचे सर्व भागास तांब्याचे पत्रे मारलेले असून त्यांवर सोन्याचा मुलामा दिलेला आहे, यामुळें तें दुरून फारच चकचकीत दिसतें. वरील कळस सर्व सोन्याचा आहे असें तेथील लोक सांगत होते.

ज्याप्रमाणें एखादे ठिकाणीं यात्रा असते, त्याप्रमाणें तेथें सदोदीत गर्दी असते. ज्याप्रमाणें नाशीक अगर त्रिंबक येथें त्रास देणारे लोक असतात, तसे तेथेंही आहेत. व ते पुढें पुढें करून प्रवाशास त्रासवून सोडतात. देऊळाचे पटांगणांत गेलें कीं, जोडे, छत्र्या, काठ्या एके ठिकाणीं ठेवाव्या लागतात. तेथें पहारा असतो. काठ्या जाते वेळेस ओळखून परत घेऊन जावें. ह्या देवळासभोंवतालचा तलाव मुंबईच्या मुंबादेवी तलावाच्या दुप्पट तिप्पट मोठा आहे. लाहोर येथील म्युझियम व बागही पहाण्यासारखी आहेत. जरी जयपूरच्या इतकीं तीं स्थानें वर्णनीय नाहींत, तरी फार चांगलीं आहेत असें ह्मटलें पाहिजे. इतकेंच नव्हे, तर लाहोर येथील बोटॅनिकल गार्डन जयपूर पेक्षांही फार सरस आहे असें ह्मटलें तरी चालेल. या बागेंत मीं दोन तीन वनस्पती पाहिल्या. त्या झाडांची पानें विड्याच्या पानासारखीं पण आकारानें जरा लहान असून भोंवतालीं कातरलेलीं होतीं. पानाचे मधील भाग अगदीं हिरवा गार असून सभोंवतालचा भाग शेंदुरासारखा चकाकत होता. तीं झाडें व त्यांवरील पानें इतकीं सुशोभित दिसत होतीं कीं, पहाणारास तीं कृतीनें केलेलीं आहेत कीं काय, असा भास होई. इकडील म्युझियममध्यें पांढरे मोर, तऱ्हेतऱ्हेचे पक्षी व इतर जनावरें इतकीं आहेत कीं, तसा संग्रह इतर ठिकाणीं क्वचितच दृष्टीस पडेल.

लाहोर येथें डिसेंबर महिन्यांत कधीं कधीं बर्फ पडतें. हा जरी इतका थंड देश आहे तरी उन्हाळाही इतका जबर होतो कीं, तो त्या थंडीची चांगली आठवण देतो. लाहोरास फळफळावळ इतकी स्वस्त मिळते कीं, एका पैशास चार पांच संत्रीं

मिळतात. बाजारांतून संत्र्यांचे ढिगाचे ढिग दृष्टीस पडतात. त्याचप्रमाणें काबुली अंगुराचे (द्राक्षाचे) डब्याची किंमत दोन अडीच आणे असते.

## लाहोर येथें भरलेली सातवीं राष्ट्रीय सामाजिक परिषद.

वास्तविक पाहतां या परिषदेचें काम तारीख २८ दिसेंबर पासूनच सुरू झालें. ते दिवशीं दयानंद अँग्लो वैदिक कॉलेजांत दिवाण नरेंद्रनाथ एम. ए. जेहलम येथील डिस्ट्रिक्ट जज्ज यांचे अध्यक्षतेखालीं जस्टिस रानडे यांचें सामाजिक सुधारणा या विषयावर व्याख्यान झालें. हें भाषण परिषदेचाच एक भाग होय असें जें वर ह्मटलें आहे त्याची परिस्फुटता केली पाहिजे. सामाजिक सुधारणा ह्मणजे काय ? सामाजिक परिषदेंत कोणत्या प्रकारचे ठराव करण्यांत येतात? वगैरे गोष्टींसंबंधानें सामान्य लोकसमूह उदासीन आहे इतकेंच नव्हे तर रुढी श्रृंखळेनें तो अगदीं बद्ध होऊन गेला आहे, यामुळें त्यास कोणी यःकश्चित हालचाल करण्यास सांगितली तर तें त्यास असह्य होऊन जातें. त्यांतही त्यांच्या आंधळ्या पुढाऱ्यांनीं सामाजिक सुधारणा व सामाजिक परिषद यासंबंधानें त्यांचे भलते ग्रह करण्याबदल अव्याहत प्रयत्न चालविले असल्यामुळें व प्रसंगविशेषीं सुशिक्षित ह्मणविणारांकडूनही एका किंवा दुसऱ्या कारणाकरितां त्याची रीत ओढली जात असल्यामुळें सामान्य लोकसमुदायासही परिषद ह्मणजे एक बागुलबोवाच होऊन बसला आहे. तेव्हां एखाद्या नवीन ठिकाणींही परिषद भरवावयाची ह्मटली ह्मणजे आधीं तिच्या

मार्गावरील हा दुसरा ग्रहरूपी कंटक काढून टाकून तो साफ करावा लागतो. व हें करण्यास इतर ठिकाणाप्रमाणे लाहोरासही जस्टिस रानडे यांचें भाषण उत्तम प्रकारें उपयोगी पडलें. या भाषणांत नवीन असे मुद्दे अर्थातच नव्हते. आपण आपल्या गृहस्थितींतील दोष दूर करण्याचा प्रयत्न केल्याशिवाय नुसत्या राजकीय हक्कच संपादण्याच्या मागें लागणें ह्मणजे अत्यंत उपहासास्पद होय. राजकीय हक्क उपभोगण्याची आंगीं पात्रता येण्यास आपली सामाजिक स्थितिही सुधारली पाहिजे. वर्षांतून एकदां राष्ट्रीय सभेकरितां देशांतील सर्व भागांतील पुढारी लोक एकेठिकाणीं जमत असतात. तेव्हां आपापल्या गृहस्थितीची इतरांशीं तुलना करून आपल्या सर्वांत सामान्य दोष कोणते आहेत, तें ठरविण्यास व दूर करण्याचे उपाय योजण्यास ही संधी फारच उत्तम असते. शिवाय ज्या कित्येकांस कायद्या वगैरेच्या नडीमुळें राजकीय कामांत पुढाकार घेतां येत नाहीं, अशा लोकांचीही या परिषदेच्या द्वारें मुलाकत होण्यास प्रसंग सांपडतो. व राष्ट्रीय सभेपासून अनायासें घडून येणारी जी ऐक्यवृद्धि तीस अधिक बळकटी आणण्याचें साधन उपलब्द होतें. वगैरे गोष्टींचाच जस्टिस रानडे यांनीं आपल्या नेहमीच्या ठसा उमटविणाऱ्या भाषणानें लोकांस गारीगार करून सोडलें. याचा परिणाम असा झाला कीं, ता० ३० डिसेंबरपासून धुकें वगैरे पडून हवा जरी बिघडून गेली होती व दुसऱ्या दिवशीं ह्मणजे सभेच्या दिवशींही जरी मधून मधून पर्जन्यवृष्टी होतच होती, तथापि सभागृहांत सुमारें दोन अडीच हजार लोक मोठ्या औत्सुक्यानें जमले होते. असो. ता० ३० डिसेंबर रोजीं सकाळीं सभा भरून निरनिराळ्या ठिकाणच्या सभा व मंडळ्या यांजकडून सादर करण्यास आलेले

रिपोर्ट वाचण्यांत आले व दुसरे दिवशीं भरणाऱ्या परिषदेकरितां विषय कायम करण्यांत आले. तारीख ३१ रोजीं परिषदेच्या कामास पर्जन्यादि अनेक विघ्नें आलीं असूनही पूर्वी ठरल्याप्रमाणें बरोबर बारा वाजतां सुरवात झाली. प्रारंभी अध्यक्ष नरेंद्रनाथ यांनीं सुमारें एक तास पर्यंत भाषण करून परिषदेपुढें येणारे विषय किती महत्वाचे आहेत तें व्यक्त केलें. व सामाजिक सुधारणेच्या मार्गांत किती अडचणी असतात हें सांगून समजूतदार लोकांनीं दृढनिश्चयानें इतर लोकांस उदाहरण घालून दिलें पाहिजे, अशी आग्रहपूर्वक विनंती केली. या नंतर सभेपुढें असलेल्या निरनिराळ्या विषयांवर उहापोह होऊन पुढील ठराव सर्वांनुमतें पसार करण्यात आले.

१. धार्मिक व सामाजिक समारंभांचे वेळीं नायकिणींचा नाच—गाणें—होऊं नये ह्मणून मद्रासचे सुधारकांनीं चालविलेला प्रयत्न ऐकून परिषदेस फार समाधान वाटतें. व ठिकठिकाणच्या स्थानिक मंडळ्याही त्यांचें अनुकरण करतील अशी परिषदेस आशा आहे. या ठरावावर राजा, रामपालसिंह, मि. लाला राजाराम यांनीं अनुमोदन दिलें व मि. गोविंद बाबाजी जोशी बडोद्यांचे भाषण करणारे यांनीं यासंबंधानें सांगितलें कीं, नीच धंदा करणारे स्त्रियांस सभ्य लोकांनीं आपल्या घरीं नाचण्यास बोलावणें हें चांगलें कृत्य नाहीं व तें करूं नये. तथापि हें अगदीं खरें आहे कीं, आपल्या कुटुंबांतील स्त्रियांस बालपणापासून नृत्यगायनादि कला शिकविण्याची चाल पूर्वापार आहे, ती चालू करण्यास उत्तेजन द्यावें. हें माझें ह्मणणें कित्येकांस चमत्कारिक वाटेल, परंतु दक्षणी लोकांत हरितालिका, मंगलागौरी इत्यादि

वार्षिक कृत्यांत स्त्रिया मोठ्या प्रेमानें नृत्यगायनादि कला समुदायानें करितात. गुजराथी लोकांत तर हा प्रघात इतका साधारण आहे कीं, पर्जन्यकाळाचे समाप्ती नंतर तीन चार महिनेपावेतों गांवोगांव भर रस्त्यांतून मोठमोठ्या लोकांकडील स्त्रियासुद्धां गर्भे (गाणीं) नृत्यकलेचे नियमांप्रमाणें सारखीं पावलें व हाताच्या टाळ्या वाजवून वाटोळ्या फिरतांना गात असतात. याकरितां या आपल्या जुन्या आर्यलोकांच्या पद्धतीस उत्तेजन मिळण्याकरितां मुलींच्या शाळांतून नृत्यगायनाची कला सुरू करण्याविषयीं ठराव करावा. बडोद्याचें श्रीमंत गायकवाड सरकारांनीं सभ्य लोकांच्या मुलींनीं या कलेचा अभ्यास करावा ह्मणून स्वतंत्र शाळा ठेविली आहे. परंतु लोकांचे अज्ञानामुळें लोक त्याचा उपयोग करून घेत नाहींत. या सूचनेस पुण्याच्या चित्रशाळेचे मॅनेजर वासुदेव गणेश जोशी यांहीं अनुमोदन दिलें आणि सर्वानुमतें ठराव पास झाला.

२ रा. – स्त्रीपुरुषांच्या शिक्षणांत आज जें विलक्षण वैशम्य दृष्टीस पडत आहे त्यांतच बहुतेक आपल्या सामाजिक अनिष्ट चालींचें मूळ आहे, हें मनांत आणून तें वैशम्य कमी करण्यासाठीं सर्व देशभर व्यवस्थेनें व एकजुटीनें परिश्रम करण्याचा काल येऊन चुकला आहे. करतां निरनिराळ्या स्थानिक, सामाजिक मंडळ्यांस परिषदेची अशी सूचना आहे कीं, त्यांनीं या बाबतींत अस्थापूर्वक व व्यवस्थित रीतीनें प्रयत्न करण्यास दिरंगाई होऊं देऊं नये. व असें झालें असतां त्यांस सरकारांतून सह्या मिळण्यासही विलंब लागणार नाहीं. या ठरावावर मि. लाला मुनशीलाल रोषणलाल, लाला रजपतराय, व मि. गोपाळदास यांचीं भाषणें झाहीं. शेवटच्या गृहस्थानीं विद्येच्या महत्वावर

रचलेल्या हिंदी कविता वाचून दाखविल्या. व ठराव सर्वानुमतें पास झाला.

३ रा. – कायस्थ सभा, आर्यसमाज, ब्रह्मसमाज, मादकद्रव्य निषेधक मंडळ्या वगैरे कडून मादक द्रव्याचें सेवन न करण्याविषयीं जे प्रयत्न होत आहेत, ते पाहून परिषदेस आनंद होतो. व इतर सभा व मंडळ्यांनीं आपल्या कार्यक्रमांत मद्यादि निषेधाचा अवश्य समावेश करावा अशी परिषदेची सूचना आहे. या ठरावावर मि० मुजुमदार, लाला शिवदास वगैरे गृहस्थांचीं भाषणे होऊन ठराव सर्वानुमते पास झाला.

४ था. – हिंदू व मुसलमानांतील कनिष्ट प्रतीच्या लोकांत अनेक ठिकाणीं जे तंटे झाले त्यासंबंधानें सरकाराचें वर्तन अमुक प्रकारचें राहील ह्मणून गव्हरनर जनरलांनीं आपल्या आग्रा येथील भाषणांत जें अश्वासन दिलें आहे, त्यावदल परिषद त्यांची आभारी आहे. तसें पांचव्या परिषदेचें सहावे ठरावांत सुचविल्याप्रमाणें सरकारच्या संमतीनें हिंदू व मुसलमानांच्या पंचाइती नेमण्याची व्यवस्था वायव्य प्रांताचे सरकारास मान्य झाली आहे, यावदल परिषदेस संतोष वाटत आहे. व परिषदेची अशी सूचना आहे कीं, जेथें दंगे झाले असतील व होण्याचा संभव असेल अशा ठिकाणीं अशाच पंचाइती नेमण्याची व्यवस्था व्हावी. तसेंच दोन्ही जातींचे धर्मविधी व सार्वजनिक समारंभ हे नेहमी निर्विवाद रीतीनें चालण्यासाठीं व मतभेदाचा प्रसंग आल्यास सरकारास व्यवस्था करतां यावी, ह्मणून त्यासंबंधानें प्रत्येकाचें पूर्वापार काय हक्क आहेत त्याची सरकारानें

अगाऊ नोंद ठेवावी. या ठरावावर मि. अल्लीभाई भिमजी, मि. चारुचंद्र मित्र, मि. मोहरम अल्ली, व मि. माणिकवाला यांचीं भाषणें झाली.

५ वा – जातीच्या ज्या पोटविभागांत रोटी व्यवहार सुरू आहे त्यांत बेटी व्यवहार सुरू करण्याचें कामीं ठिकठिकाणच्या समाज सुधारक मंडळ्याकडून उत्तेजन देण्यांत यावें. हा ठराव मि. गोविंद बाबाजी जोशी बडोदा स्टेट मधील सरकारी भाषण करणारे यांनीं सभेपुढें आणला. यांनीं आपली एक मुलगी देशस्थास व दुसरी मुलगी कऱ्हाड्यास दिली आहे. या ठरावावर लाला शिवदयाळ यांचें भाषण होऊन तो पास झाला.

६ वा – गेल्या वर्षांत पंजाब, मद्रास व मुंबई येथें एकंदर ११ पुनर्विवाह झाले, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. तसेंच शिकागो प्रदर्शना करितां बरेच संस्थानिक व इतर गृहस्थ परदेशीं जाऊन आले असूनही त्यांच्यांशीं पंक्तिव्यवहार सुरू करण्याचे कामीं समाजाकडून फारसा अडथळा करण्यांत आला नाहीं हें ही समाधान कारक आहे. परिषदेनें या संबंधानें पूर्वी केलेल्या ठरावान्वयें परदेशगमन व बालविधवा पुनर्विवाह यांचे मार्गांत येणारे प्रतिबंध दूर करण्यासाठीं ठिकठिकाणच्या सामाजिक मंडळ्यांनीं मनापासून सहाय्य करावें अशी परिषदची सर्वांस फिरून विनंती आहे. या ठरावावर पंडित शिवनारायण व लाला देवराव यांनीं भाषण केलें आणि ठराव सर्वांनुमतें पास झाला.

७ वा – बालविवाहप्रतिबंधनार्थ व लग्नकार्यांत व उत्तरक्रियेस होणारा खर्च कमी करण्याबद्दल राजपुताना, म्हैसूर, बडो-

दें वगैरे ठिकाणच्या संस्थानिकांकडून जे प्रयत्न झाले आहेत किंवा होऊं घातले आहेत. त्याबदल ते सर्व सुधारकांचे स्तुतीस पात्र आहेत, तसेंच कायस्थ, भार्गव, औदीच्य, खत्री, अगरवाले, वाणी, कुणबी, माळी, जाट व आर्य व ब्रह्मसमाज वगैरेकडून या बाबतींत जे प्रयत्न होत आहेत त्याबदल ही परिषद त्यांचे आभार मानिते. व परिषदेची अशी सूचना आहे कीं, स्वावलंबन करून या सुधारणा अमलांत आणण्यासाठीं ठिकठिकाणच्या मंडळ्यांनीं १८८२ च्या सहाव्या ॲक्टा अन्वयें आपल्या संस्था रजिस्टर कराव्या. या ठरावावर लाला वैजनाथ, लाला मेघराज वगैरे गृहस्थांची भाषणें झालीं व सर्वानुमतें ठराव पास झाला.

८ वा–सहाव्या परिषदेच्या जनरल सेक्रेटरीकडून इंडिया सरकारास पाठविलेल्या पत्राचें त्यांच्याकडून तावडतोब उत्तर आलें. याबदल परिषद त्यांची फारफार आभारी आहे. व सरकारांनीं आपल्या पत्रांत केलेल्या सूचनेस उत्तरादाखल ह्मणून परिषदेची अशी विनंती आहे कीं, सन १८८२ च्या सहाव्या कायद्या अन्वयें व स्टॅम्प ॲक्टा प्रमाणें रजिस्टर कंपन्यांस जी फी भरावी लागते, तसेंच नेहमीं कचेरी उघडी ठेवणें, सभासदांची यादी दाखल करणें वगैरे अटी पुऱ्या न केल्यास त्यांत ज्या शिक्षा सांगितल्या आहेत त्या सामाजिक मंडळ्यांस माफ असाव्या. कारण अशा मंडळ्या द्रव्य प्राप्तीस्तव बनल्या नसल्यामुळें त्यांस अशा अटींची अवश्यकता दिसत नाहीं. अशा अटीं पासून अशा मंडळ्यांचे सभासद होण्यास मात्र लोक माघार घेतात. या ठरावावर मि. करमचंद क्षेमसिंग व मि. चिंतामणरावभट यांचीं भाषणें झालीं.

९ वा–निरनिराळ्या स्थानिक सामाजिक मंडळ्यांचें परिषदेस विषेश सहाय्य घेतां यावें व सुधारणेच्या कामांत त्यांस सल्ला मसलत देण्यास व दिशा दाखविण्यास सुलभ पडावें ह्मणून प्रत्येक प्रांतांत प्रांतीक सामाजिक कमेट्यांची स्थापना होणें अवश्य आहे, असें परिषदेचें मत आहे. या बाबतींत पंजाब प्रांतानें प्रथम सुरवात करावी. व पुढील वर्षाच्या अवधींत इतर इलाख्यांतील लोकांनींही अशा प्रतिनिधीक कमेट्या स्थापन कराव्या. या कमेट्यांनीं वर्गणी जमवून तिच्या द्वारें उपदेशक नेमणें, लहान लहान पुस्तकें प्रसिद्ध करणें, सामाजिक चाली व त्यांपासून होणारे अनर्थ यांची माहिती मिळविणें वगैरें कामें करावीं. या ठरावावर मि. नायर, प्रो. लाला रुचीराम वगैरे गृहस्थांचीं भाषणें होऊन हा ठराव पास झाला.

१०. वा– १८२९ चा अक्ट २१ मध्यें धर्मांतर केलें तरी वारसपणाचे हक्क जात नाहींत असें जे मोघम कलम आहे त्यांतील हक्क शब्दापासून मिळकतीवरील हक्क असें समजावयाचे असून पालन करण्याचे अगर विवाहसंबंधी हक्क असा अर्थ कित्येक हायकोर्टांनीं केला आहे. तेणेंकरून अनेक कुटुंबांच्या स्वास्थास धक्का पोंहोंचला आहे. शिवाय हा कायदा करण्यांत हिंदू किंवा मुसलमान लोकांच्या कौटुंबिक किंवा व्यक्तिविषयक चालू असलेल्या वहिवाटींत फेरफार करावा असा सरकारचा मुळींच विचार नव्हता. करितां त्या कायद्यांतील हक्क शब्दाचा अर्थ मिळकतीवरील हक्क एवढाच नियमीत करावा.

११. वा– सिंध, पंजाब, वायव्यप्रांत, गुजराथ वगैरे ठिकाणीं मनुष्य मृत झाला असतां मोठमोठ्यानें अक्रोश करण्या-

साठीं व ऊर बडवून घेण्यासाठीं मोलानें माणसें लावण्याची जी चाल आहे ती अगदीं त्याज्य आहे. करितां ती बंद करण्याचे स्थानिक मंडळ्यांकडून तावडतोब प्रयत्न व्हावेत. या ठरावावर लाला वेणीप्रसाद व लाला किसनप्रसाद यांचीं भाषणें झाली आणि सर्वांनुमतें ठराव पास झाला.

समाप्त.